## मुंबईतील सर्वच रेल्वे स्टेशनवर सीसीटीव्ही यंत्रणे

**मुंबई, दि. २७ :** जम्मू काश्मिरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सार्वजनिक ठिकाणांवरील सुरक्षा अधिक मजबूत करण्यात येत आहे. मुंबईकर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे स्थानक आणि परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून प्रभावी देखरेख करण्यात येत आहे, अशी माहिती मुंबई आयुक्तालयातर्फे देण्यात आली आहे. मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयांतर्गत १३९ रेल्वे स्टेशन्स आहेत. दिवसभरामध्ये लोकल ट्रेनच्या जवळपास साडेसात ते आठ हजार फेऱ्या होतात. यामधून दैनंदिन ७५ ते ८० लाख प्रवासी प्रवास करतात. आयुक्तालयांतर्गत या सर्व रेल्वे स्टेशन्सवर सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे प्रवशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत प्रभावी देखरेख ठेवली जात आहे. सर्व पोलिस ठाण्यांतर्गत पोलिस मित्र, शांतता समिती, प्रवाशांबरोबरच प्रवाशी संघटना तसेच कॅन्टीन, रेल्वे, सफाई कर्मचारी, हमाल, बुट पॉलिशवाले यांच्याशी वैयक्तिक संपर्क ठेवला जातो. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक माहितीबरोबरच कोणतीही संशयित व्यक्ती, गोष्ट, वस्तू असल्यास त्याची तत्काळ माहिती मिळते. प्रत्येक वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला किमान दोन तास क्षेत्रीय ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये प्रत्येक अधिकाऱ्याला किमान चार तास पेट्रोलिंग करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन प्रवाशांना अचानकपणे तपासणी करण्याची मोहीम सुरू असते. त्यामध्ये विशिष्ट कार्यपद्धती ठरवून देण्यात आली असून त्यानुसारच ही तपासणी करण्यात येत असते. तसेच लोकल ट्रेनमध्येदेखील अचानक तपासणी म्हणजेच 'मॅसिव्ह फ्लॅश चेकिंग' करण्यात येते. त्यात एक अधिकारी व त्यांच्या सोबत तीन ते चार कर्मचारी असतात. चालू लोकलमध्ये प्रवाशांची, रॅकची आणि प्रवाशांसोबत असणाऱ्या सामानाची ते अचानकपणे तपासणी करतात. दैनंदिनरित्या घातपात तपासणी करण्यात येत असते. विविध पोलीस स्टेशनकडून या बाबींचे दैनंदिनरित्या आयुक्तालयातील 'अंतर्गत व्हाट्सअप ग्रुप'मध्ये फोटो पोस्ट करण्यात येतात. या फोटोंचे नियंत्रण कक्षात एकत्रिकरण केले जाते. घातपात तपासणीबाबत मुंबई रेल्वे पोलीस सजग राहून कार्य करत आहे, असेही रेल्वे पोलीस आयुक्तालयाने कळविले आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत

## पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या २७९५ पदांची भरती

**२९ एप्रिलपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार: राज्य लोकसेवा आयोगाची माहिती**

**मुंबई, दि.२७ :** राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी या संवर्गाची २७९५ पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी उमेदवारांना २९ एप्रिल २०२५ पासून १९ मे २०२५ पर्यंत आपला अर्ज सादर करता येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे देण्यात आली आहे. राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागणीवरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी या संवर्गाची २७९५ पदे भरली जाणार आहेत. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा तपशील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या :https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी अर्ज करताना आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

## ईडीचे कार्यालय असलेल्या इमारतीला आग



**मुंबई, दि.२७ :** दक्षिण मुंबईतील फोर्ट परिसरातील बलार्ड इस्टेटमधील कैसर-ए-हिंदइमारतीच्या चौथ्या मजल्यावर मध्यरात्री दोन अडीचच्या सुमारास भीषण आग लागली. सक्तवसुली संचालनालयाचे कार्यालय या इमारतीत आहे. आग विझवण्याचे काम मुंबई अग्निशमन दलाकडून सकाळी सुरु झाले. फोर्ट परिसरात बेलार्ड इस्टेट परिसरात असलेल्या या इमारतीत शनिवारी मध्यरात्री २ वाजल्यानंतर ही आग लागली. आग लागल्यावर अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आगीचे गांभीर्य वाढल्यामुळे आग दोन आणि तीन स्तराची असल्याचे घोषित करण्यात आले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी घटनास्थळी अग्निशमन इंजिन, जंबो टँकर, १ एरियल वॉटर टॉवर टेंडर, १ ब्रीदिंग ॲपरेटस व्हॅन, १ वॉटर क्विक रिस्पॉन्स वाहन आणि १०८ रुग्णवाहिका असा मोठा ताफा होता. ईडीचे कार्यालय असलेल्या इमारतीला आगबेलार्ड पिअर येथील ही इमारत तळमजला अधिक चार मजले अशा स्वरुपाची आहे. त्यापैकी चौथ्या मजल्यावर सक्तवसुली संचालनालयाचे कार्यालय आहे. या कार्यालयातच ही आग लागली होती. रविवारी दुपारी बारानंतर ही आग विझवण्यात अग्निशमन दलाला यश आले. घटनास्थळी मुंबई अग्निशमन दलाचा मोठा ताफा दाखल होता.

# शेती महामंडळाच्या २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाकडून घरे देणार

**५०० कोटी उत्पन्न मिळविण्याचे महामंडळाला उद्दिष्ट:महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २७ :** शेती महामंडळाच्या सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांनी महामंडळ विकसित करण्यासाठी आपले योगदान दिले आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना राहण्यासाठी योग्य अशा सदनिका म्हाडाच्या माध्यमातून बांधून देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संचालक मंडळाची ३२७ वी बैठक मंत्रालयातील महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. बैठकीला महसूल राज्यमंत्री योगेश कदम, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेती महामंडळाच्या १४ शेतमळ्यांवर२४६६ निवासस्थाने आहेत. यापैकी १७८६ निवासस्थाने राहण्यास अयोग्य ठरविण्यात आली आहेत. त्यामुळे ही निवासस्थाने रिक्त करण्याचा प्रस्ताव महामंडळाने बैठकीसाठी ठेवला होता. यावर चर्चा करताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेती महामंडळाच्या सर्वच सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या माध्यमातून चांगली घरे उपलब्ध करुन देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. गिरणी कामगारांप्रमाणे या कामगारांनाही चांगली घरे मिळाली पाहिजेत अशी भूमिका त्यांनी यावेळी



घेतली. त्याला महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनीही दुजोरा दिला. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाला उत्पन्न वाढविण्यासाठी ५०० कोटींचे उद्दिष्ट बैठकीत देण्यात आले आहे. महामंडळाच्या ताब्यात असलेल्या सुमारे ३० हजार एकर जागेवर विविध उपक्रम राबवून हे उत्पन्न वाढविण्याच्या सूचना महसूलमंत्र्यांनी केल्या. त्याबरोबरच शेती महामंडळाच्या कोणत्याही जागा मोफत वापरासाठी न देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. शेती महामंडळाच्या मळ्यावरील सेवानिवृत्त, राजीनामा दिलेल्या, मयत कर्मचाऱ्यांना बोनस वाटपास मंजुरी देण्यात आली. तर महामंडळाच्या जमिनीवर संयुक्त शेती पद्धतीने पीक योजना राबविण्यासाठी वीज आणि सौरपंप जोडणी मिळण्याबाबत तसेच सौरऊर्जा प्रकल्पासाठी ऊर्जा विभागाच्या प्रचलित भाडेपट्ट्याने जागा देण्यासाठी बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोकमठाण येथील महामंडळाची जमीन वखार महामंडळास व्यवसायाकरिता देणे, अकृषिक जमिनी विना निविदा शासनाच्या संलग्न संस्थांना भाडेपट्टाने देणे, संयुक्त शेतीसाठी ब्लॉकचा कालावधी १ एप्रिलपासून सुरु करणे, १४ मळ्यांमधील शेतजमीन भूमी अभिलेख विभागाकडे शुल्क भरून मोजणी करुन घेणे, पुणे मुख्यालय येथील ५४ सदनिका यांचे वापरमूल्य दर सुधारित करणे, १ ते २ गुंठ्याच्या आतील शिल्लक क्षेत्र विक्री करण्यास मान्यता देणे, नाशिक जिल्ह्यातील काष्टी ता. मालेगाव येथील १२ हेक्टर १७ आर जागा राहूरी कृषी विद्यापीठास पैशांची आकारणी करुन मंजुरी देणे आदी विषय बैठकीत मंजूर करण्यात आले.

## वायएमसीएचा १५० वा वर्धापन दिन साजरा



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २७ :** सर्व धर्म-पंथातील लोकांसाठी खुल्या असणाऱ्या आणि देश, भाषा, धर्म, वर्ण यांच्या पलिकडे जाऊन कार्य करणाऱ्या यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएसन (वायएमसीए) या धर्मनिरपेक्ष संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. आपल्या दीडशे वर्षांच्या प्रवासात या संस्थने चारित्र्यसंपन्न नागरिक, नैपूण्यपूर्ण खेळाडू आणि सामाजिक जाणिवा असलेली व्यक्तिमत्त्वे घडविली, असे गौरवोद्गार राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी काढले. राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत वायएमसीए या संस्थेचा १५० वा वर्धापन दिन सोहळा शुक्रवारी (२५ एप्रिल) एनसीपीए सभागृह मुंबई येथे पार पडला. यावेळी संस्थेचे राष्ट्रीय महासचिव एन. व्ही. एल्डो, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती आणि बॉम्बे वायएमसीएचे सदस्य, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, वायएमसीए हॉस्टेलच्या माध्यमातून निवास व भोजनाची सुविधा निर्माण करुन दिल्यामुळे व्यापारी-उद्योजकांच्या जीवनात या संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली.

वायएमसीएने गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे तसेच क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे कार्य यापुढेही सुरु ठेवावे. मुंबईच्या लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात वायएमसीएने देखील आपले कार्यक्षेत्र आणि सेवा वाढवणे गरजेचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी बॉम्बे वायएमसीएच्या 'हाऊ मच कॅन वी डू फॉर अदर्स' या कॉफीटेबल पुस्तकाचे तसेच स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

## दीनदयाल उपाध्याय अध्यासन स्थापन करण्यात येणार:राज्यपाल सी पी राधाकृष्णन

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २७ :** पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी साम्यवाद व भांडवलशाही यांचा सुवर्णमध्य साधत एकात्म मानवतावादाचा सिद्धांत मांडला होता. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार युवकांमध्ये पोहोचवण्यासाठी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात दीनदयाल उपाध्याय अध्यासन स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी केली.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मुंबईतील रुईया महाविद्यालयात दिनांक २२ ते २५ एप्रिल १९६५ या कालावधीत एकात्म मानवतावाद या विषयावर व्याख्याने दिली होती. या व्याख्यानमालेच्या हीरक महोत्सवानिमित्त रुईया महाविद्यालय येथे आयोजित चर्चासत्राला राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी संबोधित केले. कार्यक्रमाला केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल, कौशल्य व रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सुरेश सोनी, दीनदयाल शोध संस्थेचे सरचिटणीस अतुल जैन, विविध विद्यापीठांचे कुलगुरु उपस्थित होते.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, साधी राहणी व उच्च



विचारसरणी असलेल्या उपाध्याय यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केले. तसेच सध्याच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील या कार्याला पुढे घेऊन जात आहेत. ग्रामीण भागात रस्ते, गरिबांना गॅस कनेक्शन, पेयजल या योजना त्याचाच परिपाक आहेत. कोरोना काळात पाश्चात्य देशांनी लस शोधली असती तर तिची किंमत जनतेच्या आवाक्यात राहिली नसती. मात्र, भारताने संपूर्ण देशवासियांना मोफत कोरोना प्रतिबंधक लस दिली आणि त्यापलीकडे जाऊन अनेक देशांना मोफत लस उपलब्ध करुन दिली. हा सर्वसमावेशक विचार पंतप्रधान श्री. मोदी यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्याकडूनच अंगिकारला आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

वास्तवाचे भान ठेवून अन्न वाया जाऊ देऊ नये, प्रत्येकाने धन अर्जन करावे परंतु अनावश्यक खर्च करू नये तसेच स्वतःसाठी न जगता इतरांसाठीही जगावे हा दीनदयाल उपाध्याय यांचा विचार स्वीकारला पाहिजे, असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृत पर्यटकांच्या कुटुंबियांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सांत्वन



■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. २७ :** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे या पर्यटकांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

राज्य शासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कुटुंबियांना धीर दिला. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्यासोबत उपस्थित असणाऱ्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार योगेश टिळेकर, आमदार भीमराव तापकीर, सुनील कांबळे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी देखील मृतांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी मृतांच्या कुटुंबियांनी पहलगाममध्ये घडलेल्या दुर्घटनेबाबत सविस्तर माहिती सांगितली.

## आगामी तीन महिन्यांत जगभरात तापमान आणखी वाढणार

**मुंबई :** पुढील तीन महिन्यांत जगभरात तापमानातील वाढ अधिक तीव्र होणार असल्याचा अंदाज जागतिक हवामानशास्त्र संघटनेने वर्तवला आहे. उत्तर दक्षिण प्रशांत, पूर्व आशिया आणि अरब या भागातही उष्णता उच्चांक गाठण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मे ते जुलै २०२५ या कालावधीत जगातील बहुतांश भागात पारा वाढू शकतो असा अंदाज जागतिक हवामानशास्त्र संघटनेने व्यक्त केला आहे. सध्या तापमानवाढ हा हवामानतज्ज्ञ, अभ्यासक यांच्या चिंतेचा विषय झाला आहे. वाढत्या उष्णतेचे परिणाम मानवी आरोग्य तसेच शेतीवर होत आहेत. त्याचबरोबर तापमानवाढीतील उच्चांकही दिवसेंदिवस विविध भागात नोंदवले जात आहेत.

# महाराष्ट्राला देशातील पहिले बेघरमुक्त राज्य करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन





■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. २७ :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामविकास विभागाने उत्तम कामगिरी केली असून केंद्राकडून आणखी १० लाख घरांना मान्यता मिळणार आहे. घर मंजूर झाल्यावर जमीन उपलब्ध करून देण्यासाठी मोहीम स्तरावर काम करण्यासह एकही व्यक्ती बेघर राहणार नाही यासाठी प्रयत्न करा. या माध्यमातून राज्याला देशातील पहिले बेघरमुक्त राज्य करा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. प्रशासन लोकाभिमुख आणि गतिशील करण्यासाठी मनुष्यबळाचे योग्य व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. 'यशदा' येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागातर्फे आयोजित पंचायत राज राज्यस्तरीय कार्यशाळेत मुख्यमंत्री बोलत होते. कार्यक्रमाला ग्रामविकास पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे महासंचालक निरंजन सुधांशू, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, उत्तम प्रशासनासाठी मनुष्यबळाचा विकास महत्त्वाचा आहे. त्यासाठी उपलब्ध मनुष्यबळाचा कार्यक्षम उपयोग कसा करता येईल याचा विचार करावा. आज उत्तम प्रकारचे तंत्रज्ञान उपलब्ध असून ते समजून घेत त्याचा उपयोग करणारी यंत्रणा उभारण्यावर भर द्यावा. इतर ठिकाणच्या चांगल्या कल्पनांचे अनुकरण करावे. राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेसाठी कार्यशाळेत शिकायला मिळणाऱ्या बाबी महत्त्वाच्या ठरतील. अनुभवी अधिकाऱ्यांचे विविध प्रयोग इतरांना मार्गदर्शक आहेत, ते संकलित झाले आणि समजून घेतले तर प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यास मदत होते.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर घरांना पहिल्या दिवसापासूनच प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून सौर ऊर्जेवर विजेची सुविधा करायची आहे. या कामांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून मनुष्यबळ आणि निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांनी करावा, असे आवाहन त्यांनी केले. यातून रोजगाराची संधीही निर्माण होईल, असा विश्वासाही त्यांनी व्यक्त केला.

### शंभर दिवस कार्यक्रमात उत्तम कामगिरीसाठी पुरस्कृत करणार

राज्य शासनाने १०० दिवसांचा कार्यक्रम सुरू केला असून सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी त्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. ग्रामविकास विभागाने या कार्यक्रमात अत्यंत उत्तम कामगिरी केली आहे. या कार्यक्रमाच्या अवलोकनानंतर राज्यासाठी उत्तम कार्यपद्धतीच्या अनुषंगाने मार्गदर्शन होणार आहे. क्वालिटी कौन्सील ऑफ इंडियाच्या परीक्षणानंतर उत्तम काम करणारे अधिकारी समोर येतील, त्यांच्या कामांची नोंद घेण्यात येईल. यातून सर्वांना चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल. राज्यातील साडेबारा हजार कार्यालयांमध्ये या कार्यक्रमाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणणे आपल्याला शक्य झाले. त्यातून कामकाजात पारदर्शकता येण्याबरोबरच प्रशासनाबाबतची विश्वासार्हता वाढणार आहे. जलजीवन योजनेतील त्रुटी बाजूला करून ती योजना प्रभावीपणे राबवावी. योजना पूर्ण झाल्यानंतर ती चालविण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाचा विचार करावा. कार्यशाळेच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण कामासाठी काय करता येईल याचा विचार करावा, त्यासाठी क्षमतावाढ आणि प्रशिक्षणावर भर द्यावा. बांधकामाचा दर्जा सुधारण्यासाठी अधिकारी आणि कंत्राटदार यांचे प्रशिक्षण घ्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

### येत्या पाच वर्षात आरोग्य सुविधांच्या सुधारणेवर भर

आरोग्य क्षेत्रात राज्याने मोठी गुंतवणूक केली असून या क्षेत्राला गती देणे आवश्यक आहे. येत्या पाच वर्षात नागरिकांच्या आरोग्य सुविधांवर लक्ष केंद्रित करायचे आहे. प्रत्येक पाच किलोमीटर क्षेत्रात उत्तम दर्जाच्या शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावा लागेल. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रात सुधारणा घडवून आणल्यास सामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा देता येतील, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

सर्वांगीण प्रगतीसाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे

शैक्षणिक क्षेत्रातील सुधारणांसाठी संबंधित घटकांचे सहकार्य घेणे महत्त्वाचे आहे. अंगणवाडीपासून या सुधारणांना सुरुवात करावी. सेवाभावी संस्थांच्या सहभागातून चांगल्या सुविधा करता येतील. जलसंधारण, उद्योगाला प्रोत्साहन, विविध योजनांचे अभिसरण आणि घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनावर भर द्यावा. नदी-नाल्यातप्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी. 'लखपती दीदी' सारख्या योजनांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करून मोठे परिवर्तन घडवून आणता येईल. बचत गटातील महिलांना फिरती बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या उत्पादनाला ग्राहकांपर्यंत पोहोचविता येईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

### ३०लाख घरे उभारण्याचे ग्रामविकास विभागाचे उद्दिष्ट -मंत्री जयकुमार गोरे

मंत्री श्री. गोरे म्हणाले, आतापर्यंत साडे तेरा लाख घरांना मान्यता देण्यात आली आणि १० लाख घरांना पहिला हप्ता देण्यात आला, त्यातील ४६ हजार घरे पूर्ण झाली आहेत. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून ३० लाख घरे उभारण्याचे उद्दिष्ट आहे, त्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजना तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून या गावांमध्ये शासनाच्या योजनांची १०० टक्के अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट राहील.

या योजनेच्या माध्यमातून गाव स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल. योजनेअंतर्गत चांगले काम करणाऱ्या गावांना पुरस्कृत करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेवरील जनतेचा विश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधान सचिव श्री. डवले यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. १०० दिवसाच्या कार्यक्रमातील २१ पैकी २० मुद्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे. विविध जिल्ह्यांनी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून नागरिकांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत.

उमेद अभियान, आरोग्य विमा योजना, शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आदी विविध विषयांवर पहिल्या दिवशी चर्चा करण्यात आली, अशी माहिती त्यांनी दिली.

ग्रामविकास विभागाच्या १०० दिवस कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेले सिंगल युनिफाईड पोर्टल, संचालक ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय यांनी तयार केलेल्या आवास वितरण प, भूमिलाभ पोर्टल, महाआवास अभियान डॅशबोर्ड, आयुक्त मनरेगा नागपूर यांनी तयार केलेल्या पीएमएवाय आणि नरेगा डॅशबोर्डचे उद्घाटन आणि राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानाअंतर्गत बनविलेल्या चित्रफितीचे अनावरण श्री. फडणवीस यांच्या हस्ते कारण्यात आले.

राज्यातील २० जिल्हा परिषदांनी राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांवर आधारित पुस्तिकेचे तसेच महाआवास त्रैमासिकाचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. विविध विषयातील उत्तम कल्पना आणि कामकाजातील सुधारणांशी संबंधित दस्तावेज तयार करण्यासाठी विविध गटात चर्चा करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

कार्यक्रमाला राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक उपस्थित होते.

## रखडलेल्या ६४ झोपु योजनांसाठी महापालिका स्वारस्य पत्र मागवणार!



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २७ :** रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना जलद गतीने मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने विविध प्राधिकरणांवर जबाबदारी सोपविली असून महापालिकेला झोपु प्राधिकरणाचे अधिकार बहाल केल्यामुळे आता महापालिका रखडलेल्या ६४ योजनांसाठी विकासकांकडून स्वारस्य पत्र मागविणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दहा झोपु योजना सुरु करण्यासाठी विकासकांकडून निविदा मागविल्या आहेत. म्हाडानेही चार योजना सुरु करण्याची तयारी केली आहे. पालिकेला अधिकारराज्यातील रखडलेल्या २२८ झोपु योजनांची जबाबदारी राज्य शासनाने महापालिका (७८), म्हाडा (२४) या नियोजन प्राधिकरणांसह महाप्रीत (५७), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (४६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (५), शहर औद्योगिक विकास महामंडळ (६), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (१२) आणि महाहौसिंग (एक) या महामंडळांवर सोपविली आहे. या योजनांसाठी सुरुवातीला झोपु प्राधिकरणावरच नियोजन प्राधिकरणाची जबाबदारी होती. परंतु ही जबाबदारी आमच्याकडे द्यावी, अशी मागणी महापालिकेने केली होती. पायाभूत सुविधा उभारण्याची संपूर्ण जबाबदारी स्थानिक प्राधिकरण म्हणून आमच्याकडे असल्यामुळे रखडलेल्या झोपु योजनांबाबत नियोजन प्राधिकरणाचे अधिकार बहाल केले तर योजनांना गती त्यामुळे आता पालिकेने ६४ योजनांसाठी स्वारस्य पत्र जारी करण्याचे ठरविले आहे. पालिकेकडे ७८ योजना सोपविण्यात आल्या असल्या तरी यापैकी तातडीने पुनर्विकास सुरु करता येईल, अशा या योजना असल्याचे पालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. या योजनांसाठी इतर नियमावलीसोबत झोपु योजना संलग्न करण्यास शासनाने मान्यता दिल्यामुळे अव्यवहार्य असलेल्या योजना व्यवहार्य होऊ शकतील, असा विश्वास पालिका आयुक्त भूषण गगरानी यांनी व्यक्त केला. स्वतंत्र कक्ष हवा! म्हाडाकडे २४ योजना सोपविण्यात आल्या असल्या तरी झोपु प्राधिकरणाचे अधिकार बहाल करण्यात आलेले नाहीत. उर्वरित सर्व योजनांसाठी झोपु प्राधिकरण हेच नियोजन प्राधिकरण असणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे उर्वरित प्राधिकरणांकडून सादर होणाऱ्या झोपु योजना मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात यावा, अशी मागणीही केली जात आहे.

# साकोली येथे हनुमान जयंती उत्सवात संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी ,दि. २७ :** साकोली येथे दिनांक १२/४/२५ ला मॉन्टेक्स क्रिकेट कूब, लाखांदूर रोड साकोली च्या वतीने हनुमान जयंती साजरी करण्यात आली.सायंकाळी ६ वाजता हनुमान मूर्तीची स्थापना करून महा आरती करण्यात आली. भक्त जणांनी महाआरतीचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी मॉन्टेक्स क्रिकेट कूबच्या सर्व पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# जिल्हा बँकेचे अध्यक्ष सुनीलभाऊ फुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉँग्रेसने पवित्र स्थळांची माती व पाणी गोळा करून काढली कलश यात्रा

## अखंड महाराष्ट्राची शपथ घेऊन महाराष्ट्र दिनी मुंबईत पूजा केली जाणार आहे.





**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. २७ एप्रिल :** महाराष्ट्र हा अखंड महाराष्ट्र राहिला पाहिजे आणि या अखंड महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्राने आपल्या अस्मितेसाठी कटीबद्ध राहावे, महाराष्ट्राच्या संस्कृतीतील धर्म, जात, महापुरुषांचा आदर, सन्मान आणि विचार व्हावा, त्याच भावनेने संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पवित्र स्थळांची माती, पाणी गोळा करून मुंबईत महाराष्ट्र दिनी पूजन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव कार्यक्रमांतर्गत मंगल कलश रथयात्रा काढण्यात येत असून, त्यानिमित्त खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनील भाऊ फुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कुंभली दुर्गाबाई डोंह कलशात पवित्र जल व माती घेतले व या कार्यक्रमाप्रसंगी लाभलेले साकोली तालुका कॉंग्रेस कमिटी चे पदाधिकारी राष्ट्रवादी कॉँग्रेस तालुकाध्यक्ष अंगराजजी समरीत. मा.जिल्हा परिषद सदस्या भुमालाजी पंधरे साकोली शहर अध्यक्ष सुरेश बघेल. राष्ट्रवादी महासचीव प्रभाकर सपाटे. शैलेशजी गजभिये .अनील टेंभरे. परशुराम लाजेवार. राष्ट्रवादी सोशल मीडिया प्रमुख नंदूभाऊ पटले अंकित लोधीकर. धनंजय शहारे. शिवराज पठाण. ज्योती कणोजे. नंदेश्वरजी. व या कलश यात्रा निमित्त बाहेरील प्रमुख पाहुणे तालुका अध्यक्ष पवनी विजयजी सावरबांधे. सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती पवनी लोमेशजी वैद्य. तोमेश्वर जी पंचभाई. चेतनजी डोंगरे. राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष लाखांदूर बालूजी चुन्ने. राकेशजी राऊत. व तालुक्यातील राष्ट्रवादी कॉँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुमसर पंचायत समितीच्या दस्तऐवज खोलीला शॉर्टसर्किटने भीषण आग

## १९६५ पासून जमा केलेले सर्व दस्तऐवज, संगणकीय उपकरणे, पंख्यासह इतर साहित्य जळून खाक

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा , दि. २७ एप्रिल :** तुमसर तालुक्यातील ९७ ग्रामपंचायतींचा कारभार पाहणाऱ्या पंचायत समितीच्या दस्तऐवज खोलीला शनिवारी सकाळी ८ वाजता भीषण आग लागली. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची प्रामिक शक्यता वर्तवली जात आहे. या आगीत १९६५ पासून जमा केलेले सर्व दस्तऐवज, संगणकीय उपकरणे, पंखे आणि इतर महत्त्वाचे साहित्य जळून खाक झाले.

शनिवारी चौथा शनिवार असल्याने कार्यालय बंद होते. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीच्या धुराने संपूर्ण इमारत व्यापली होती. माहिती मिळताच स्थानिक नागरिक, अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी धावले. अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.

काही तासांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. तोपर्यंत दस्तऐवज खोलीतील सर्व कागदपत्रे आणि उपकरणे जळून गेली. या घटनेनंतर आग अपघाताने लागली की हेतुपुरस्सर लावली गेली, यावर पंचायत समितीच्या आवारात चर्चा सुरू आहेत. कारण या आगीत अनेक शासकीय उपक्रम, तपासणीतील प्रकरणे, सरपंच, सचिव आणि काही अधिकाऱ्यांविरोधातील चौकशीची कागदपत्रे जळून गेली आहेत. त्यामळे संशय वाढला आहे.



या आगीत प्रशासनाने अनेक वर्षांच्या कागदपत्रांची डिजिटल प्रत तयार केली नव्हती, हेही उघड झाले. त्यामुळे 'डिजिटल इंडिया' मोहिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी चौकशी सुरू आहे. आग लागण्यामागचे नेमके कारण स्पष्ट होईपर्यंत अनेक प्रश्न अनुत्तरित राहणार आहेत.

***पूर्णतः दरवाजे, खिडक्या बंद असतानाही पंखे सुरू -***

ही दस्तऐवज खोली पंचायत समितीच्या नवीन इमारतीत आहे. येथे १९६५ पासूनचे सर्व महत्त्वाचे कागदपत्र, विविध प्रकरणांचे रेकॉर्ड्स आणि प्रशासकीय फाईली ठेवण्यात आल्या होत्या.

या घटनेबाबत एका कर्मचाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, खोलीत दरवाजे आणि खिडक्या बंद असतानाही पंखे सुरू होते. पंख्यांच्या वायरिंगमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# सार्वजनिक पाणी प्याऊ चे लोकार्पण

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. २७ एप्रिल :** आज दिनांक २७/०४/०२५रविवार ला वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्थेचे, अध्यक्ष, डॉ सोमदत्त ब्रह्मानंदजी करंजेकर यांचे संकल्पनेतून दरवर्षी प्रमाणे या वर्षी साकोली, लाखनी, लाखांदूर येथे सार्वजनिक प्याऊ चे लोकार्पण करण्यात आले. साकोली येथे नवीन बस स्थानकात व स्टेट बँकेच्या समोर तर लाखनी येथे ग्रामीण रुग्णालयात, लाखांदूर येथे नवीन बस स्थानकात प्याऊ सुरू करण्यात आले साकोली येथे बस आगाराचे आगार प्रमुख श्री सचिन आगरकर यांचे हस्ते उद्घाटन झाले.प्रमुख उपस्थितीत महिला समन्वय केंद्राच्या समन्वइका सौ इंद्रायणीताई कापगते,सामाजिक कार्यकर्ते श्री राधेश्याम मुंगमोडे, खैरी ग्राम पंचायत उप सरपंच सत्यपाल मार्सकोल्हे ,माजी नगरसेविका सौ मिनाताई लांजेवार, किसान संघाचे मधुकर कापगते, जमनापूर च्या सरपंचा सौ पूजाताई देशमुख, प्रशांत चांदेवार, प्रणय फंदे, सोनू बढवाईक ,रेशीम लांजेवार,भावेश लांजेवार,ऋग्वेद




येवले ,दिनेश कापगते, प्याऊ चे चालक श्री नागपुरे आणि चालक वाहक आणि बसस्थानकातील इतर कर्मचारी उपस्थित होते. तर लाखनी येथे ग्रामीण रुग्णालयातील वरिष्ठ परिचारिका सौ दहेकार मॅडम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख कार्यकर्ते श्री सचिन उके, अभिषेक गिऱ्हेपुंजे, प्रज्वल मेहर, श्री रामटेके , ऋग्वेद येवले , रुग्णालयातील इतर कर्मचारी उपस्थित होते. तर लाखांदूर बस स्थानक समोर सामाजिक कार्यकर्ते दुर्योधन जी हटवार , यांचे हस्ते उद्घाटन झाले, या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते श्री मंगेश करंडे जितेंद्र ढोरे पत्रकार, शरद साळवे पत्रकार , राहुल राऊत , तुषार इंचिलवर , स्वप्नील येवले व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामान्य नागरिकांनी आणि प्रवाशांनी डॉ. सोमदत्त ब्रह्मानंदजी करंजेकर यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे. तहानलेल्या प्रवाश्यांना याचा लाभ होताना दिसत आहे.

# गोपीवाडा येथे स्वच्छता अभियान

**भंडारा :**भंडारा येथून जवळ असलेल्या ग्राम गोपिवाडा येथे दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला शंकरपट चे आयोजन केले जाते. या दरम्यान इथे यात्रा असते परंतु यात्रेनंतर मोठयाने इतरत्र कचरा पडून राहते.कमांडो ग्रुप चे संस्थापक यांच्या आहवान पश्चात. ग्राम पंचायत, एमएमपीएल इंडस्ट्रीज,आणि कमांडो ग्रुप कडून व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.या प्रसंगी कमांडो ग्रुप चे संस्थापक, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर डोळस,सरपंच विनायक टांगले,कंत्राटदार संजय शेंडे,योगेश गहाने,आदेश कानतोडे,प्रहरी बहुउद्देशीय संस्थे चे सर्व सदस्य,कमांडो ग्रुप चे कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनो दोन दिवसीय संपात सहभागी व्हा ; रामलाल बिसने

**सिहोरा , दि. २७ एप्रिल :** भंडारा जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी भंडारा जिल्हा परिषदेसमोर होणाऱ्या दोन दिवसीय संपात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी कामगार सेना ५८२५ चे जिल्हा कार्याध्यक्ष रामलाल बिसेन सिहोरा यांनी केले आहे. या दोन दिवसीय संपाचे नेतृत्व विभागीय सचिव हेमराज वाघाळे, जिल्हाध्यक्ष मारुती चेटुले, जिल्हा कार्याध्यक्ष रामलाल बिसेन, राज्य संघटक राजेश दिवटे, जिल्हा उपाध्यक्ष कवडू ठलाल व जिल्हा सचिव माणिक लांबट हे करणार आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी कामगार सेना ५८२५ च्या वतीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही शासन दुर्लक्ष करीत आहे. यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी कामगार सेनेने संपूर्ण महाराष्ट्रात दोन दिवसीय संपाची हाक लगावली आहे.१ व २ मे या दोन दिवसीय संपात महाराष्ट्रातील ६० हजार कर्मचारी सहभागी होणार आहेत.

संप यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी भंडारा जिल्हा परिषदेसमोर १ व २ मे च्या संपात सहभागी व्हावे असे आवाहन रामलाल बिसेन, शैलेश चंद्रिकापुरे, रोशन मरसकोल्हे, खेमराज शरणांगत, मुरलीधर उरकुडे, संतोष पंचबुद्धे, शेरू चामट, संतोष इलमे, जयप्रकाश डोंबळे व संदीप बनकर यांनी केले आहे.

***शासनाचा दुजा भाव :-***

शासनाच्या विविध व जनकल्याणकारी योजना राबविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे कर्मचारी आज दारिद्र्य नारायणाचा अवतार म्हणून तुटपुंज्या वेतनावर जगत आहेत. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना शासनाकडून कसलीही सुविधा नसली तरी रात्रंदिवस काम करीत आहेत. सहा सहा महिने वेतन सुद्धा मिळत नाही. या अंतिम टप्प्याच्या कर्मचाऱ्या बरोबरच शासन दुजा भाव करीत आहे म्हणूनच राज्यातील ६० हजार कर्मचाऱ्यांनी दोन दिवसीय संपाचा निर्णय घेतला आहे.

***कर्मचाऱ्यांच्या मागण्या :-***

वसुली व उत्पन्नाची अट रद्द करण्यात यावी, नगरपालिका व जिल्हा परिषद कर्मचाऱ्याप्रमाणे वेतनश्रेणी लागु करण्यात यावी, वेतन वेळेवर देण्यात यावे, वेतनातून कपात झालेली भविष्य निर्वाह निधी नियमित कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी तसेच निवृत्ती वेतन व ग्रॅज्युटी लागू करण्यात यावी या मागण्यांचा समावेश आहे.

# दुषित पाण्यामुळे मोहगाव वासियांचे आरोग्य धोक्यात

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** तुमसर तालुक्यातील मोहगाव (खदान) येथे सार्वजनिक विहिरीजवळ अवैधरित्या गोठा तयार करून त्यात पाळीव जनावरे बांधली जातात. परिणामी पाळीव जनावरांचे मलमूत्र विहिरीच्या पाण्यात शोषित होत असल्याने विहिरीच्या दुषित पाण्यामुळे मोहगाववासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

यामुळे ग्रामस्थांनी याबाबत पंचायत समिती, गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.

मोहगाव (खदान) येथील राजेंद्र कटरे नामक पशुपालक यांनी डॉ. रविंद्र पटले यांच्या घरासमोरील सार्वजनिक विहिरीजवळ गोठा तयार केला. त्यात आपली पाळीव जनावरे बांधले जात आहे. पाळीव जनावरांचे मलमूत्र विहिरीच्या पाण्यात शोषित होत आहे. त्यामुळे गावातील त्या विहिरीचे पाणी वापर करणाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पंचायत समितीतुमसर येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभिर्याने लक्ष देऊन सार्वजनिक विहिरीजवळील जनावरांचा गोठा दूर करावा, जेणेकरुन विहिरीतील पाणी दुषित होऊन याचा फटका ग्रामस्थांच्या आरोग्यावर होणार नाही, अशा मागणीचे निवेदन गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आला. तक्रारीमध्ये शिवदास सोनवाने, बाबुलाल रहांगडाले, संतोष सोनवाने, गायत्री सोनवाने, रंजीत राऊत, मदन कुंभरे, मनोहर मेश्राम, अनिल मेश्राम, आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

तरी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तक्रारीची गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ कारवाई करण्यात यावी.

# कर भरणाऱ्या नागरिकांसाठी विमान मोफत प्रवास

## कर भरणाऱ्यांसाठी खैरी वलर्मझरी ग्रामपंचायतच्या अभिनव उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. २७ एप्रिल :** साकोली तालुक्यातील वलमाझरी स्मार्ट ग्रामपंचायतीने उपक्रमशील सरपंच पुरुषोत्तम रुखमोडे यांच्या मार्गदर्शनात एक आगळावेगळा निणऱ्य घेतला आहे. कराची संपूर्ण रक्कम भरणाऱ्या व्यक्तीला विमान प्रवास घडविण्याचा धाडसी निर्णय ग्रामपंचायतीने ग्रामपंचायतच्या मासिक सभेत घेतला आहे.

साकोली तालुक्यातील खैरी-वलमाझरी ही ग्रामपंचायत खैरी, वलमाझरी, पिटेझरी आणि आमगाव अशा चार गाव मिळून गटग्रामपंचायत आहे.

या ग्रामपंचायतीला आतापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत राज्यस्तरीय तृतीय तसेच केंद्र शासनाचा स्मार्ट ग्राम पुरस्कार सुद्धा मिळाला आहे. या ग्रामपंचायत अंतर्गत चारही गावात वर्षभर विविध योजना ग्रामपंचायतीच्या वतीने राबविल्या जातात.

### गावकऱ्यांत लागली स्पर्धा

त्यामुळे या ग्रामपंचायत अंतर्गत चारही गावातील कुटुंब आता संपूर्ण कर भरण्याच्या तयारीला लागले असून त्यांच्यात स्पर्धा निर्माण झाली आहे. ग्रामपंचायतचा हा निर्णय गावाच्या विकासात एक पाऊल पुढे नेणारा ठरल्याने सर्वत्र या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

उपक्रम राबविण्यात येत असून त्याला लोकांचाही तेवढाच भरभरून प्रतिसाद मिळत आहे. गावातील लोकात ही स्फूर्ती कायम राहावी आणि आपले गाव स्वच्छ, निरोगी, सुंदर व सदा हरित राहण्यासाठी सरपंच पुरुषोत्तम रुखमोडे जनतेसाठी नवनवीन कल्पना शोधून प्रसंगी प्रशासनाचे मार्गदर्शन घेऊन उपक्रम राबवित असतात. त्यांच्या या कर्तुत्वाला त्यांचे ग्रामपंचायत पंचायत कार्यालय पदाधिकारी, कर्मचारी, सचिव, गावातील वरिष्ठ नागरिक आणि गावकरी सहकार्य करीत असतात.

लकी ड्रॉ द्वारे निवड खैरी-वलमाझरी या ग्रामपंचायतीत २३ एप्रिल रोजी पार पडलेल्या मासिक सभेत सन २०२५ २०२६ चे सर्व प्रकारचे घर कर व पाणीपट्टी कर व त्यापुर्वी राहीलेले सर्व कर दि. १५ मे पर्यंत जे लाभार्थी भरतील अशा लाभार्थ्यांचा लकी ड्रॉ काढण्यात येईल. या लकी ड्रॉ मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या कुटुंबातील कोणत्याही एका व्यक्तीला जाताना नागपूर ते हैद्राबाद विमान प्रवास, तिथे राहण्याची व्यवस्था आणि परत येतांना रेल्वेचा वातानुकुलीत प्रवास अशी संधी मिळणार आहे. तसेच व्दितीय क्रमांकला १०० किलो जय श्रीराम तांदुळ, तृतीय क्रमांकासाठी कुटुंबातील ५ लोकांना नागझिरा अभयारण्याची सफारी, चौथ्या क्रमांकाला २० किलो तुर दाळ, पाचव्या क्रमांकला १ टिन खादय तेल आणि सहाव्या क्रमांकला १ चांदीचा शिक्का असे बक्षीस देण्यात येणार आहे.

यासोबतच ड्रॉ बरोबर सर्व कर भरणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला निःशुल्क दळण दळून दिले जाईल व आरओचे आरओचे शुद्धपाणी सुद्धा देण्यात येणार आहे. अशी माहिती खैरी वलमाझरी गट ग्रामपंचायत चे सरपंच पुरुषोत्तम रुखमोडे यांनी दिली आहे



***दरवर्षीप्रमाणे आम्ही यावर्षी सुद्धा नियमित कर भरणाऱ्या नागरिकांसाठी वेगवेगळ्या योजना आणल्या असून यात ग्रामस्थांच्या भरभरून प्रतिसाद मिळत आहेत व स्वच्छने गट ग्रामपंचायतचे नागरिक कर भरत आहेत ही बाब ग्रामपंचायत साठी व तालुक्यातील असो किंवा जिल्ह्यातील असो सर्वांसाठी प्रेरणा देणारी असून प्रत्येक नागरिक यांनी आपली सामाजिक जबाबदारी समजून प्रामाणिकपणे स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर नियमित भरले पाहिजे.***

**पुरुषोत्तम रुखमोडे, सरपंच ,**
**ग्रामपंचायत खैरी वलमाझरी**

# अभिव्यक्तीचा गळा अवरुद्ध करण्याच्या काळात साहित्यिकांची जबाबदारी मोठी- डॉ.श्रीपाद जोशी

## वैनाकाठ फाउंडेशनचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. २७ एप्रिल :** नामदेव ढसाळ कोण? असा प्रश्न सेन्सार बोर्डातील तथाकथित व्यक्ती विचारत असतील तर शासन ज्या संस्थांना अनुदान देते त्या संस्थेत असलेल्या व्यक्तींची मानसिकता काय आहे हे लक्षात येते.सध्याच्या काळात अभिव्यक्तीचा गळा अवरुध्द करणे सुरू आहे.अशावेळी साहित्यिकांनी वैचारिक मशाली प्रज्वलित करुन परिवर्तन घडवून आणण्याची गरज आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले.

ते स्प्रिंग डेल स्कूल भंडारा येथील ज्ञानदीप सभागृहात आयोजित वैनाकाठ फाउंडेशनच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी दिल्ली साहित्य अकादमीचे सदस्य अँड. लखनसिंह कटरे हे होते.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वैनाकाठ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष अमृत बन्सोड, विदर्भ साहित्य संघ भंडारा शाखेचे अध्यक्ष डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे उपस्थित होते.कवी मुकुंदराज काव्य पुरस्कार कवी सुनील उबाळे,संभाजीनगर यांच्या 'उलट्या कडीचं घर'या काव्यसंग्रहाला देण्यात आला.

कै.घनश्याम डोंगरे कथासंग्रह पुरस्कार लेखक प्रसाद कुमठेकर, वसई यांच्या 'इतर गोष्टी' कथासंग्रहाला देण्यात आला ना.रा.शेंडे कादंबरी पुरस्कार अशोक पवार,चंद्रपूर यांच्या 'बेडा' कादंबरीला देण्यात आला. डॉ.अनिल नितनवरे समीक्षा पुरस्कार डॉ.विनोद राऊत, वर्धा यांच्या 'नामदेव ढसाळ यांची कविता: आस्वाद आणि चिकित्सा' या ग्रंथाला तर डॉ.आंबेडकर वैचारिक ग्रंथ पुरस्कार पुरुषोत्तम संबोधी,बेंगळूर यांच्या 'धम्मक्रांतीची वाटचाल आणि प्रदुषणे' या ग्रंथाला देण्यात आला.साहित्य पुरस्कार प्राप्त



साहित्यिकांना रोख पाच हजार रुपये,सन्मानचिन्ह,सन्मानपत्र,फळ व महावस्त्र देण्यात आले . महात्मा कालिचरण नंदागवळी समाजमित्र पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विलास भोंगडे,नागपूर यांना तर जे. पी. नाईक शिक्षणसाथी पुरस्कार यंग फाऊंडेशनचे संदीप देवरे,नंदुरबार यांना प्रत्येकी रोख अकरा हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, महावस्त्र व फळ देवून सन्मानित करण्यात आले. साहित्य पुरस्कार प्राप्त कवी लेखक कादंबरीकार यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करतांना आपले साहित्य हे जीवनानुभवाचे सार असल्याचे सांगितले. विलास भोंगाडे यांनी गोसेखुर्द धरणाच्या लढ्यासोबतच सध्या सुरु असलेल्या दिडोंरी लढ्याची माहिती दिली. आदिवासीच्या हक्कासाठी लढणारे संदीप देवरे यांनी सातपुड्याच्या भागात येण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणातून अँड. लखनसिंह कटरे यांनी वैनाकाठ फाउंडेशनचे पुरस्कार अत्यंत पारदर्शकपणे दिले जात असल्याचे सांगून ग्रंथ परीक्षण समितीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुरेश खोब्रागडे यांनी केले.

प्रास्ताविक विवेक कापगते यांनी तर आभार प्रा.नरेश आंबिलकर यांनी मानले.पुरस्कार विजेत्यांच्या सन्मानपत्राचे वाचन आकाशवाणीच्या उद्घोषिका विणा डोंगरवार,डॉ. कविता राजाभोज यांनी केले.ग्रंथ परीक्षकांच्यावतीने डॉ.रेणुकादास उबाळे यांनी मनोगत व्यक्त केले.

पुरस्कारांना अर्थसहाय्य मोहन मिरासे,संजय जांभुळकर,ईश्वर नाकाडे,सुनिता नितनवरे,संवेदना कापगते,मृणाल हुमणे,रोहित भोंगाडे यांनी केले. कार्यक्रमाला प्रा.भगवान सुखदेवे,डॉ.दशरथ कापगते, शिक्षणाधिकारी रवींद्र सोनटक्के, डॉ.के.एल.देशपांडे, डा.ममता राऊत, प्रभू राजगडकर, डॉ.जयश्री सातोकर,मंगला गणवीर, देवानंद घरत, प्रमोदकुमार अणेराव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बासप्पा फाये,रामेश्वर बागडे,रोशन कावळे,स्प्रिंग डेलच्या शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# पिंपळगाव ते नेरी हा रस्ता ठरत आहे मृत्यूमार्ग !

**मोहाडी :** पिंपळगाव ते नेरी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना या रस्त्यावरून मार्गक्रमण करतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्यावरील खड्डे चुकवितांना वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. किरकोळ अपघात तर नित्याची बाब झाली आहे. परिणामी रस्त्यावर खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी संभ्रमावस्था वाहन चालकांची होत आहे. या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करून तातडीने डांबरीकरण करून रहदारीस रस्ता सुरळीत करून देण्याची मागणी नागरिक करीत आहेत. पिंपळगाव ते नेरी हा रस्ता येथे स्थानिक नागरिकांचा मुख्य मार्ग आहे. आणि हा रस्ता सरळ जिल्ह्याशी जोडलेला आहे. त्यामुळे कोणतेही शासकीय कामे करण्यासाठी तहसील, जिल्हा परिषद येथे जाण्याचे झाल्यास याच रस्त्याने मार्गक्रमण करावे लागते . रहदारीचा मुख्य मार्ग असल्याने वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. परंतु या रस्त्याची अत्यंत बिकट दुरावस्था झाली आहे. हा शेतकऱ्यांना शेतात जाण्याचा आणि विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याचा मार्ग आहे. रस्त्यावरील खड्डे चुकवितांना वाहने उसळत असल्याने अनेक नागरिक मणक्याचे आणि पाठीचे आजाराने बेजार झाले आहेत. रात्रीच्या वेळी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे खड्ड्यातून अनेक गाड्या उसळून पडल्यामुळे अपघात झाले आहेत . तर कित्येक लोक जखमी झाले. खड्डेमय रस्त्यामुळे दूध तसेच भाजीपाल्याची आवक जावक करन्यासाठी वाहन चालक आपली वाहने भाड्याने देत नाही असे बोलले जात आहे. अनेकांची वाहने खराब रस्त्यामुळे क्षतीग्रस्त होत असून याचा वाहन चालकांना चांगलाच फटका बसत आहे. रोजच रस्त्यावरून मार्गक्रमण करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे . रस्त्याची अनेकदा थातुरमातुर डागडुजी करण्यात आली. परंतु काही महिने लोटत नाही तोच रस्ता जैसे थे स्थितीत दिसून येत आहे . या रस्त्याचे तात्काळ दुरुस्तीकरण व डांबरीकरण करण्यात यावे , अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात निष्पाप २७ पर्यटकांचा बळी गेल्याने जग हादरले आहे. सदर घटना अत्यंत क्रूर व निंदनीय ठरली आहे. या घटनेत प्राण गमावलेल्या निष्पाप पर्यटकांना देशभर श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून हिंदू मुस्लिमांमध्ये द्वेष पसरण्याचे काम राजकीय पातळीवर सुरू झाले होतेच. कारण उथळ राजकारणी तर मशिदीत घुसून मारण्याची, तर काहीजण मंदिर उडवून देण्याची भाषा करीत होते. या सर्वांना कडक सुरक्षा व्यवस्था आहे. परंतु ज्यांची माथी फिरते त्यांना कसली आली सुरक्षा? इतका द्वेष राजकारणात यापूर्वी तरी इतका पोहोचलेला नव्हता. हा द्वेष काही मोदी आल्यापासुन गेल्या दहा वर्षात निर्माण झाला नाहीये. अशा प्रकारची कत्तल जगभर चालु आहे. भारतच नाही तर फ्रांस, इंग्लंड देश पण अशा मुलतत्ववाद्यांच्या जिहादात होरपळले आहे. जे लोक हे इंटलीजेंन्सचे फेल्युअर आहे असं म्हणताय, ते एक गोष्ट विसरताय की, तिथलं राज्य सरकार, काही स्थानिक पब्लीक ही आतंकवाद्यांना सहानुभुती दाखवणारी आहे. जिथ कुंपनच शेत खाणार असेल, तर सरकार तरी काय करणार? पण याचा अर्थ सरकारला 'क्लीनचीट' देऊन चालणार नाही. काही गोष्टी विसरताच येणार नाही. कंधार हायजॅक, अक्षरधाम हल्ला, रघुनाथमंदिर हल्ला, कारगिल हल्ला, संसदेवर हल्ला, अमरनाथ यात्रेकरूंवर झालेला हल्ला, गोधरा कांड, पठाणकोट हल्ला, उडी हल्ला, पुलवामा हल्ला अशी सारी प्रकरणे भाजपची सत्ता असलेल्या राज्यांमध्येच घडलेली आहे. त्यामुळे 'हम ऐसा करेंगे, वैसा करेंगे' या मोदींच्या घोषणा कायम फेल ठरल्या आहे ही वस्तुस्थिती आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वरील घटना झाल्या, त्यावेळी नेमके देशातील काही राज्यातील निवडणुका सुरू असतानाच का होतात? हा संशोधनाचा विषय आहे. सध्या तर दंगे झाले म्हणून बुलडोझर फिरवण्याची मानसिकता तयार झाली आहे. अमुक जातीच्या विरोधात बोलला म्हणून त्याला मारून टाकण्याची मानसिकता तयार झाली आहे. अमुक धर्म संपवून टाकण्याची भाषा करण्याची मानसिकता दिसत आहे. धर्मांतर करा नाहीतर मृत्यूला सामोरे जा अशीही परिस्थिती निर्माण झाली आहे. आमचे ऐकले नाही तर तुमचे राष्ट्र उद्धवस्त करू अशी मानसिकता दिसत आहे. आमचाच धर्म, आमचाच पक्ष श्रेष्ठ असे म्हणत तलवारी, बंदुका, हत्यारे फिरवत राहणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच आमचीच संस्कृती सर्व जगात एकमेव आणि थोर असा डंका पिटणाऱ्यांची मानसिकता वाढीस लागली आहे. खास करून धर्म आणि राजकारण यांच्यात अशा मानसिकतेचे पुंड आणि गुंड सोकावलेले आहेत. सगळा समाज त्यांनी ताब्यात घेतला आहे. सामान्य लोकांना त्यांनी वेठीस धरले आहे. वेगवेगळे विषय काढून समाजात सगळीकडे विष कालवायला हे आघाडीवर असतात. अशा मानसिकतेचे हे लोक मनोविकृत समजले पाहीजे. वर वर आपणास या सर्वांमध्ये खोटारडेपणा, हिंसकपणा, दहशतवादी वृत्ती आणि सगळे कायदे पायदळी तुडविणे ही लक्षणे दिसतात.

# काश्मीरमधील 'त्या' २७ जणांसाठी 'भारत' रडतोय!





पहलगाममधल्या बैसरन इथं अतिरेकी पोहोचले. पर्यटकांना धर्म विचारु लागले, तेव्हा त्यांना एका स्थानिक घोडेस्वाराने विरोध केला. घोडेस्वारीसाठी तो पर्यटकांना तिथं घेऊन आला होता. यांचा धर्म कोणताही असेल; पण हे सर्वजण निष्पाप आहेत. काश्मीरचे पाहुणे आहेत. कोणावरही गोळी झाडू नका, अशी विनंती त्याने केली.

अतिरेक्यांनी त्याचं ऐकलं नाही. या घोडेस्वाराने एका अतिरेक्याच्या हातातली एके४७ रायफल हिसकावून घेतली. तोवर दुस?याने त्याच्यावर हल्ला केला. धरपकड झाली आणि या घोडेस्वाराला गोळी लागली. रक्तबंबाळ झालेल्या या घोडेस्वाराला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं. पण तोवर या घोडेस्वाराचा मृत्यू झाला होता. या घोडेस्वाराच्या विरोधामुळे अनेकांचे प्राण वाचले, असं पर्यटकांनी सांगितलं.

या घोडेस्वाराचे नाव सैय्यद हुसैन शाह. घरात कमावणारा एकुलता एक पोरगा अतिरेक्यांशी लढता लढता मृत्यूमुखी पडला. धर्माच्या नावावर कुणी कितीही वणवा पेटवला, तरी जसे धर्मांध विकृत अतिरेकी असतात, तसेच त्या धर्मांधतेच्या विरोधात उभी राहणारी सैय्यदसारखी लढाऊ बाण्याची माणसंही असतात. पाकिस्तानातून अतिरेकी आपल्या देशात घुसून हिंदू लोकांना गोळ्या घालून मारत आहे. मग हिंदू हिंदू म्हणून मिरवणारे बजरंग दल, आरएसएस, विश्व हिंदू परिषदेचे ठेकेदार पाकिस्तान मध्ये एके ५६ घेऊन कधी घुसणार आहे? त्यानी आपले २७ मारले, त्यांचे आठ दहा तरी मारणार आहे की नाही?

बरं पाकिस्तान मध्ये नका जाऊ किमान सीमेवर जाऊन डोळे वटारतील का? त्यांच्या बाजूने चीन असला म्हणून काय झाले, मोदींनी लाल डोळे करून चीनकडे बघितले तरी तो घाबरतो, असे मोदी भक्त म्हणतात.

मग नेमके मोदी हवेत तीर का मारतात याचे उत्तर मिळाले पाहीजे. पहेलगामच्या आतंकवादी हल्ल्याला पाच दिवस झालेत. बऱ्याच लोकांचे अंतिमसंस्कार बाकी आहेत. टीव्ही बघा पंतप्रधानांचा निवडणूक प्रचार सुरू झाला आहे. पर्यटक अजून घरीही पोहचले नाही. दुर्दैव म्हणावे लागेल देशाचं.

इतिहास असा आहे की, भारत स्वतंत्र झाला त्यावेळी १९४७ साली काश्मीरवर एक राजा राज्य करीत होता. त्याला भारतामध्ये विलीन होण्यास सांगितले होते. परंतु तो तयार नव्हता. परंतु अचानक एक दिवस पाकिस्तान आर्मीने काश्मीरवर हल्ला केला व ते श्रीनगरच्या जवळ पोहोचले होते. तेव्हा त्या राजाने भारत सरकारला विनंती केली की, आम्हाला वाचवा व आमचे राज्य तुम्ही घ्या. रात्रीतून भारतीय सैन्याने काश्मीर मधून पाकिस्तानी सैन्याला मागे ढकलले व काश्मीर भारतात विलीन झाले.

हा प्रश्न हिंदू मुस्लिम नसून पाकिस्तानला १९४७ पासून काश्मीर हवा आहे. कारण सिंधू नदी व तिच्या उपनद्या ह्या काश्मीर मधून जातात व पाकिस्तानचे सर्व शेतकरी सिंधू नदीवर अवलंबून आहे. हा फार मोठा पाणी प्रश्न आहे. परंतु राजकारणी लोक याला मुद्दाम धार्मिकतेचा मुलामा देत आहे. हा सर्व दोष राजकारण्यांचा आहे का? पाकिस्तान व भारत अतिरेक्यांना थांबू शकत नाही? हे लोक सर्व करू शकतात. परंतु मुद्दाम करत नाही. या प्रश्नावरच त्यांना मतदान होते व त्यांचे सरकार तयार होते. पाकिस्तानशी चर्चा करून त्यांना चांगली धमकी दिली पाहिजे, की जर हे अतिरेकी तुम्ही संपविले नाही. तर आम्ही तुमच्या घरात घुसून त्यांना मारू. तरच ते लोक ॲक्शन घेतील. कारण भारत पाकिस्तान युद्ध कोणत्याही देशाला परवडणार नाही.

**थर्ड अम्पायर**



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

युक्रेन आणि गाझा पट्टीत सर्व बरबाद झाले आहेत. युद्ध झाले तर तो देश अनेक वर्षे मागे निघून जातो. लोकशाहीमध्ये सरकारला जबाबदार धरणं हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य असतं. जर माध्यमं सरकारला प्रश्न विचारण्याऐवजी धर्माच्या चष्म्यातून घटना समजावू लागली, तर ही लोकशाही साठी अत्यंत गंभीर बाब ठरते.

आज गरज आहे ती खऱ्या प्रश्नांची, खरी उत्तरं शोधण्याची. कारण दहशतवाद धर्म पाहून नव्हे, तर एका विशिष्ट हेतूसाठी निर्दोषांना लक्ष्य करतो आणि त्याला रोखण्याचं काम केवळ राष्ट्रभक्तीच्या नावाखाली भावना पेटवण्याने नाही, तर उत्तरदायित्व आणि सजग नागरिकतेनेच होणार आहे.

जेव्हा हिंदूंचे आराध्य राजे छत्रपती शिवरायांना अर्वाच्य शिवीगाळ करणाऱ्या आणि राजमाता जिजाऊ मासाहेबांचं चारित्र्यहनन करणाऱ्या कोरटकरला विशेष सुरक्षा पुरवली, तेव्हा तोंडातून ब्र सुद्धा न काढणाऱ्या बांडगुळांना आज सध्या हिंदू धर्माचा पुळका आलाय. छत्रपतींच्या पुतळ्यात भ्रष्टाचार झाल्यामुळे तो कोसळला. त्यावेळी पुतळा बनवणाऱ्या, बसवणाऱ्या, उद्घाटन करणाऱ्या, कुणाकुणाचाही निषेध न करणारे आज हिंदुत्व शिकवताहेत.

रोज आत्महत्या करणारा हिंदू शेतकरी राजा स्वतःच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरतो तेव्हा त्याची हेटाळणी करणारे आज हिंदूत्व शिकवताहेत. ज्याअर्थी एवढा धिंगाणा घालताय त्याअर्थी 'दाल में कुछ काला है'. कीतीही मुस्लीमद्वेष पसरवाल, पण लोक आता हुशार झालेत. या देशावर प्रेम असलेले देशातले सगळे मुस्लिम जागेवरच आहे. कारण वरच्या सगळ्या प्रसंगांमध्ये जेव्हा अनेकजणांनी शेपूट घातले होते, तेव्हा हे मुस्लिम बांधव काश्मिरमध्ये हिंदुंच्या पाठीशी सक्रियपणे उभे होते.

### काश्मीर समस्येवर हा उपाय शक्य?

देशातील नागरिकांनी काश्मीरला जाऊ नये, अमरनाथ यात्रा करू नये असे संदेश समाज माध्यमांमध्ये फिरत आहे. जर आपण सर्वांनी तीन-चार वर्षे अमरनाथ यात्रा करणे थांबवले तर आपण मरणार का? ही तीर्थयात्रा काश्मिरींसाठी उपजीविकेचे साधन आहे. हेच काश्मिरी आपल्या सुरक्षा दलांवर जसे की बीएसएफ, एसआरपीएफ, सीआरपीएफ, आयपीएस, आयएएस जवानांवर हल्ला करतात, दगडफेक करतात आणि भारतीय सैन्याला विरोध करतात. ते काश्मीरमध्ये धार्मिक शाळा बांधू देत नाहीत. काश्मीरवर दोन वर्षांसाठी आर्थिक बहिष्कार घाला. आझादी असल्याचा दावा करणाऱ्या सर्व यासीन मलिक आणि गिलानींचे तंबू कोसळतील. मग बघा, पाकिस्तान आणि चीन किती काळ आणि किती काश्मिरींना निधी देत राहतील. काश्मीरला जाऊ नका, त्याऐवजी शिमलाला जा, दार्जिलिंगला जा, केरळला जा, कन्याकुमारीला जा, ऊटीला जा, ओडिशाला जा, उत्तराखंड, गुजरातला जा, तुम्हाला कुठेही जा, पण काश्मीरला जाणे म्हणजे दहशतवाद्यांचे हात बळकट करण्यासारखे आहे. कोणीही कोणत्याही काश्मीर एम्पोरियममधून काहीही खरेदी करू नये. राष्ट्राच्या भल्यासाठी, फक्त दोन वर्षे हे करून पहा, संपूर्ण चित्र बदलेल.

### मोदींना काही प्रश्न का विचारले जाऊ नयेत?

अग्निवीर सारख्या थर्डक्लास योजना का आणल्या, डिफेन्स बजेट का कमी केले, लाखाच्या वर जवानांची भरती का झाली नाही, सुरक्षा दलाचे खाजगीकरण का केले, पोलीस आणि आर्मी पर्यटन क्षेत्रात का उपलब्ध नव्हती, इंटेलीजेंस का फेल झाले, एवढे आतंकवादी बॉर्डर मधून इतके आत कसे घुसले, कसे आरामात पळून गेले, मोदी आणि डोभाळ काय करत होते? नोटबंदीने आतंकवादाची कंबर तोडलेली मग हे कसे घडले, कलम ३७० हटवून अदानीला तेथे भूखंड देवून देशाला काय फायदा झाला? आणि पुलवामा अटॅक होऊन सहा वर्ष होऊन गेली, तरी त्यावर काहीच कसे झालें नाही? ती केस थंड डब्यात टाकण्याचे काय कारण? २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला होता.

त्यावेळी राज्याच्या गृहमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. मग आताच्या केंद्र सरकारमधील गृहमंत्र्यांनी राजीनामा का दिला नाही? त्यांचा राजीनामा पक्षात व पक्षाबाहेरील नेते का मागत नाही? कारण यापूर्वी लोकशाही जिवंत होती, उत्तरदायित्व होतं आणि लोकांची भावना केंद्रस्थानी होती. पण आजच्या काळात चित्र पूर्णतः वेगळं आहे.

### मुस्लीमद्वेष पसरण्याचा फायदा नक्की कोण घेतं?

हिंदूंवर झालेल्या पहलगाम हल्ल्याचा निषेधच आहे. पण तो नक्की कुणी केलाय? हे समोर येईपर्यन्त कुणीच कुणावर विश्वास ठेवणार नाही. ते समोर आल्यावर त्यामागचे सूत्रधार कोण होते? त्यांना मिल्ट्री आणि बीएसएफची सुरक्षा भेदून आत यायला कुणी मदत केली? हे सगळे कळाल्याशिवाय उगाचंच उठसूट कुठल्याही धमार्ला दोष देवू नये. मागे एकदा एका बाईच्या नादी लागून कुरुलकर नांवाच्या देशद्रोह्यानं आपल्या सुरक्षाव्यवस्थेतली गुप्त माहिती पाकिस्तानला पुरवली, त्यावेळी त्याला पाठीशी घालणा?या वृत्तीसारखी प्रवृत्ती या हल्ल्याची मास्टरमाईंड असणारच.

त्या अतिरेक्यांना शस्त्रास्त्रं आणि पोलीस गणवेश पुरवून, सगळा प्लॅन रचून, "तुम्ही हिंदू आहात का मुसलमान? हे विचारून माणसे मारा म्हणजे भारत देशात मुस्लीमद्वेष पसरून दुही माजेल आणि आमचा फायदा होईल." अशी सुपारी देणारा दगाबाज कोण आहे, त्याला काय फायदा झालाय, हे सिद्ध झालेच पाहीजे. मुस्लीमद्वेष पसरण्याचा फायदा नक्की कोण घेतं? हे न्यायसंस्थेत तपासणी होऊन समोर आले पाहिजे. मग त्या दगाबाजाचा बदला कसा घ्यायचा ते संविधान, पोलीस दल आणि भारतीय लष्कर ठरवेल. पण पुलवामा हल्ल्याचा अजूनही शोध लागलेला नाही, हे सगळ्या भारतीयांच्या लक्षात आहे.

### काश्मिरींबाबत गैरसमज पसरवला जात आहे?

दहशतवाद्यांचा हल्ला अत्यंत पूर्वनियोजित होता. त्यांनी अतिशय निर्दयीपणे धार्मिक ओळख निश्चित करत केवळ हिंदूंची हत्या केलीय, जेणेकरून सामाजिक सलोखा आणखी बिघडावा, देशात अस्थिरता यावी असे त्यांचे होरे आहेत. हे दहशतवादी पाकपुरस्कृत जरी निघाले तरीही सीमापार जाऊन याचे उत्तर त्या सर्व दहशतवाद्यांना कंठस्नान घालूनच दिले जाईल हे नक्की.

सुरक्षा यंत्रणा कुठे गाफिल राहिल्या आणि गुप्तचर यंत्रणांना याचा सुगावा कसा लागला नाही याचीही खोलात जाऊन चौकशी होणं अनिवार्य आहे. धमार्चं राजकारण करून दहशतवादी कृत्य करताना धर्मांध माथेफिरूंकडून धर्म विचारला जातो. पण प्रेम, आपुलकी आणि सद्भाव असलेली माणुसकीची कृती करणाऱ्यांकडून धर्म विचारला जात नाही. ती कृती भेदाच्या पलीकडली, हृदयातून येणारी असते. काश्मीर मधील सर्व शहरांमधून नागरिक उत्स्फूर्तपणे ह्या हल्लयाचा निषेध करत आहेत. तेथील वर्तमानपत्रांमधून निषेधाचा सूर ऐकू येत आहे. काश्मिरी माणसांनी त्या प्रसंगामध्ये प्राण पणाला लावून पर्यटकांना मदत केली. राजकीय स्वार्थामधून, धर्मांधतेचा विखार पसरवण्यातून जे कृत्य घडवले गेले ते निषेधार्ह आहे. पण त्यामागे हे सारे काश्मिरी लोक आहेत असा जो गैरसमज पसरवला जात आहे तो सर्वस्वी गैर आहे.

### एका जीवघेण्या संशयाला जागा आहे की नाही?

हिंदू मुस्लिम वाद निर्माण व्हावा ह्यासाठी खेळलेली "एक जीव घेणी" चाल असल्याची समाज माध्यमांमध्ये सुरू असलेली चर्चा पटो ना पटो पण त्यात काही अंशी सत्य दिसत आहे. कारण ह्या अगोदर इतके हल्ले झाले, पण कधी धर्म विचारला नाही. आले गोळ्या घातल्या आणि पळून गेले. आताच का धर्म विचारायची वेळ आली आतंकवाद्यावर? मोदींनी त्याच दिवशीचा जम्मू काश्मीर दौरा रद्द केला आणि विदेशात का गेले? नेमके त्याच दिवशी पहलगाम येथील बंदोबस्त का बाहेर पाठवला गेला? रोज तेथे पर्यटकांच्या सुरक्षितेकरिता बंदूकधारी बंदोबस्त असतो. मग त्याच दिवशी बंदोबस्त का नव्हता? भारतात सर्वात जास्त जवान तैनात केले जातात, तेथे २७ लोक मारली जातात आणि एकही आतंकवादी का सापडत नाही? मीडियाला देखील जे सांगेल त्या बातम्या वाजविल्या जातात की नाही?

जर ३७० कलम रद्द करून असे हल्ले होत असतील तर कशावरून देश सुरक्षित हातात आहे? सुरक्षा व्यवस्थेच्या गलथानपणा मुळे दहशतवादी हल्ला झाला असे आपणास वाटत नाही का? असा प्रश्न कठुआ येथील भाजप आमदार देवेंद्र मान्याल यांना एका राकेश शर्मा नावाच्या पत्रकाराने विचारल्यावर त्याच्यावर जीवघेणा हल्ला का झाला? पहलगाममध्ये जो हल्ला झाला ते सुरक्षा यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणेचं अपयश आहे हे काय लपून राहिले आहे का? दोनशे किलोमीटर अतिरेकी आत आले, दीड तास अंधाधुंद गोळीबार करीत राहिले आणि सहीसलामत निघून गेले. हे का घडले? कसे घडले?

# महाराष्ट्राच्या भल्यासाठी एकत्र या!

(कालच्या अंकावरून पुढे)

१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर १९६७ साली कॉंग्रेसचे स. गो. बर्वे यांना बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. हे स. गो. बर्वे सनदी अधिकारी होते. त्यांना यशवंतराव चव्हाण यांनी कॉंग्रेस मध्ये आणून इशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उमेदवारी दिली होती.

याच स.गो. बर्वे यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली होती. याच आधारावर गुजरातमध्ये जीआयडीसी स्थापन करण्यात आली. स. गो. बर्वे यांच्या निधनानंतर त्यांच्या भगिनी ताराबाई सप्रे यांनाही इशान्य मुंबई लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता.

ज्या आदित्य ठाकरे यांच्या विरोधात वरळीतून एकनाथ शिंदे यांनी राज्यसभेवर निवडून आलेल्या माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा यांना उभे केले होते त्याच मिलिंद देवरा यांचे तीर्थरूप मुरली देवरा (तब्बल बावीस वर्षे मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष राहिलेले) यांना महापौर बनविले ते बाळासाहेब ठाकरे यांनीच.

१३ ऑगस्ट १९६० रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्याने भल्या भल्यांना वठणीवर आणणाऱ्या मार्मिक या जागतिक कीर्तीच्या पहिल्या मराठी व्यंगचित्र साप्ताहिकाचे प्रकाशन मुख्यमंत्री आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते झाले होते. पहिल्या महिला मराठी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता.

कॉंग्रेसचेच प्रणव मुखर्जी यांनाही राष्ट्रपती पदासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. या दोन्ही वेळा शिवसेना ही भारतीय जनता पक्ष प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीत होती. डॉ . ए. पी. जे. अब्दुल कलाम हे राष्ट्रपती आणि अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान असतांना डॉ. मनोहर गजानन जोशी हे लोकसभेचे अध्यक्ष होते आणि याच काळात संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे चित्रकर्ती सौ. चंद्रकला कुमार कदम यांनी तयार केलेले भव्य तैलचित्र लावण्यात आले.

या अभूतपूर्व ऐतिहासिक कार्यक्रमाच्यावेळी 'राम' म्हणून ओळखण्यात येणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांचे 'लक्ष्मण' प्रमोद महाजन हे कां उपस्थित नव्हते आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे सुपूत्र विश्वासराव सावरकर आणि त्यांच्या सहधर्मचारिणीना कशा परिस्थिती मध्ये दिल्लीत नेण्यात आले याचा साद्यंत वृत्तांत ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम आणि शिवसेना नेते सुभाष देसाई यांच्याकडून जाणून घ्यावा.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे सहकारी असलेल्या शिवसेनेशी युती २४ सप्टेंबर २०१४ रोजी एकनाथ खडसे यांनी कुणाच्या सांगण्यावरून तोडली हेही जाणून घ्या आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वतंत्र लढले. पण शरद पवार यांच्या अदृष्य हातांनी देवेंद्र फडणवीस यांचे अल्पमतातील सरकार वाचल्यानंतर २२ वर्षात जेवढी बदनामी सहन करावी लागली नाही तेवढी बदनामी १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ या २२ दिवसांत सहन करावी लागली, असे सांगून धर्मेंद्र प्रधान आणि चंद्रकांत पाटील यांना मातोश्रीच्या दरवाजावर पाठविण्याचे काम करीत आणि उद्धव ठाकरे यांचा पाठिंबा मिळवून २०१९ पर्यंत पाच वर्षे निर्धोक सत्ता देवेंद्र फडणवीस यांनी राबविली.

**उत्तरार्ध**

५ डिसेंबर २०१४ रोजी सकाळी विरोधीपक्षनेते असलेले एकनाथ संभाजी शिंदे उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिल्याने सायंकाळी मंत्री झाले. २०१९ ला राजकीय समीकरणे बदलली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केवळ उद्धव ठाकरे यांना विरोध करण्यासाठी आपल्या इंजिनाची दिशा फिरती ठेवली? मग कधी भारताच्या राजकीय क्षीतिजावरुन मोदी शाह यांना हद्दपार करण्यासाठी राज गर्जना झली तर कधी हिंदुत्ववादी शाल पांघरून नरेंद्र मोदी यांच्या व्यासपीठावर जाऊन महायुतीची सहानुभूती मिळविली.

२८ नोव्हेंबर २०१९ रोजी ज्या उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीसाठी मातोश्री कुंदाताई उर्फ मधुवंती ठाकरे यांच्या सह राज ठाकरे सहकुटुंब उपस्थित राहिले त्याच राज ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षातून बाहेर पडल्याचे विस्मरण होत यंदाच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांचा 'खरा गद्दार' असा केलेला उद्धार मातोश्री कुंदाताईंसह तमाम मराठी आणि हिंदूंना घायाळ करुन गेला.

आज उद्धव आणि राज ठाकरे या दोघांनी समोरचा गारदी ओळखून हातात हात घालून, खांद्याला खांदा मिळवून, तंगड्यात तंगड्या न घालता शिवसैनिक आणि महाराष्ट्र सैनिक यांना सोबत घेत महाराष्ट्र धुंडाळून काढण्याची गरज आहे, काळाची मागणी आहे, मराठी माणूस, हिंदू बांधव वाट पहातोय. शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज विजयी उमेवारापेक्षा जास्त होते याचे ठसठशीत उदाहरण ठाणे विधानसभा मतदारसंघात मिळालेल्या राजन विचारे (शिवसेना) आणि अविनाश जाधव (मनसे) यांच्या मतांची बेरीज संजय केळकर यांच्या मतापेक्षा जास्त दिसून येते. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा फायदा होतो. हे टाळण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे.

बेगडी हिंदुत्ववादी राजकारण्यांचा बुरखा टराटरा फाडून, राजकीय पर्यटन करणाऱ्या वाचाळवीरांना खड्यासारखे बाजूला टाकून पुनश्च हरी ओम करीत उभे रहा, ठाकरे बंधूंनी एकमेकांना साद घालण्याची, टाळी देण्यासाठी कोण पुढाकार घेईल याची वाट न पाहता मातोश्री ते शिवतीर्थ हे अंतर तोडून छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील त्यांच्या पायाशी विसावलेल्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकावर त्यांच्या आवडत्या चाफ्याच्या फुलांचा वर्षाव करीत चांदा ते बांदा कूच करावी. आई तुळजाभवानीचे आणि आई एकवीरेचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत. उचला तो बेल भंडार आणि चला जनतेचा आशीर्वाद घेण्यासाठी.

बांधावरच्या शेतकऱ्यापासून तर चक्र चालवणाऱ्या मजूरापर्यंत आणि दीन दलित, दुबळ्या, रंजलेल्या, गांजलेल्या समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत, आदिवासी, महिला सर्वांना तुमची आस आहे, सर्वांना तुमच्यावर विश्वास आहे तो सार्थ ठरविण्यासाठीची हीच योग्य वेळ आहे. मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या वेळी सेनापती बापट म्हणाले होते, महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलेमहाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चालेखरा वीर वैरी पराधीनतेचा` महाराष्ट्र आधार हा भारताचा`' हेच लक्षात ठेवून करु या वाटचाल. जय महाराष्ट्र !

--------------

योगेश वसंत त्रिवेदी
मुंबई. ९८९२९३५३२१

■ ■ ■

**वाचक लिहितात**

### आतंकवादाचा निषेध आणि कठोर कारवाईची गरज!

"आतंकवादाला धर्म नसतो" असे आपण अनेकदा ऐकतो. मात्र, जेव्हा धर्म विचारून गोळ्या झाडल्या जातात, तेव्हा हा एक विशिष्ट समुदायच अशा प्रकारचे हल्ले करतो, हे स्पष्टपणे दिसून येते. याआधीही अनेकदा अशा हल्ल्यांचे प्रकार घडले आहेत आणि प्रत्येक वेळी पाकिस्तानने खतपाणी घातलेल्या संघटनांचा त्यामागे सहभाग असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे आता पाकिस्तानला कठोर धडा शिकवणेच गरजेचे आहे. सरकारने यासाठी ठोस आणि कठोर पावले उचलली पाहिजेत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

या घटनेविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजून काही प्रश्न निर्माण होतात. जसे, आतंकवादी भारतीय सैन्याचा गणवेश घालून आले होते तर, त्यांच्यापर्यंत तो गणवेश पोहोचला तरी कसा? त्यांच्यापर्यंत गणवेश पोहोचवण्याच्या कटात तेथील स्थानिक नागरिक सहभागी होते का, की अन्य कुणी? हा सर्व प्रकार गुप्तहेर खात्याच्या नजरेतून सुटलाच कसा? हे सगळे प्रश्न आज प्रत्येक भारतीय नागरिकाला सतावत आहेत आणि त्यांची उत्तरं मिळायला हवीत.

यासोबतच या घटनेतून पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले आहे की, जर कोणीतरी आपल्या एका गालावर मारले, तर दुसरा गाल पुढे करायचा ही मानसिकता आता टाकून देण्याची वेळ आली आहे. तसेच सर्व हिंदूंनी आपापसातील जातपात विसरून, एकत्र येऊन एकसंध हिंदू म्हणून उभे राहणे ही काळाची गरज आहे.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

# दह्यात मिसळा या ५ गोष्टी आणि चेहऱ्यावर लावा



उन्हाळ्यात आहारात दही समाविष्ट करणे फायदेशीर मानले जाते, परंतु त्वचेसाठी तसेच केसांसाठीही फायदेशीर आहे. दह्यामध्ये ग्लायसिन आणि प्रोलाइन अमीनो ॲसिड असतात जे कोलेजन तयार करण्यास मदत करतात. यामुळे त्वचा लवचिक, चमकदार राहते. दह्यामध्ये व्हिटॅमिन ए देखील असते जे त्वचा तरुण ठेवण्यासाठी आवश्यक असते. दह्यामध्ये प्रथिने, जस्त, तांबे, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स, बी12, व्हिटॅमिन डी असे अनेक पोषक घटक आढळतात, त्यामुळे ते सेवन करण्यासोबतच चेहऱ्यावर लावल्यानेही अनेक फायदे होतात.

उन्हाळ्यात सूर्यप्रकाशामुळे त्वचा खराब होऊ शकते. चेहऱ्याला चमकदार बनवण्यासाठी त्याच्यावर दहीचा वापर केला जातो. दही थेट चेहऱ्यावर लावता येते. याशिवाय, त्यात काही गोष्टी मिसळून लावल्याने चेहरा उजळतो. उन्हाळ्यात होणाऱ्या पुरळ, टॅनिंग आणि पिंपल्ससारख्या त्वचेच्या समस्यांपासून मुक्तता मिळविण्यासाठी दही मदत करू शकते. तुम्ही चेहऱ्यावरील घाण आणि मृत त्वचा काढून टाकण्यासाठी आठवड्यातून एकदा त्वचेला एक्सफोलिएट करणे महत्वाचे आहे. यामुळे चेहरा चमकतो आणि ब्लॅकहेड्स आणि व्हाइटहेड्सची समस्या राहत नाही. यासाठी दह्यात कॉफी मिसळून चेहरा स्क्रब करता येतो. उन्हाळ्यात टॅनिंगची समस्या दूर करण्यासाठी दह्यात चिमूटभर हळद मिसळून दररोज रात्री झोपण्यापूर्वी लावू शकता. हात आणि पायांवरून टॅनिंग काढायचे असेल तर या पेस्टमध्ये थोडासा लिंबाचा रस देखील घालू शकता. उष्णतेमुळे चेहरा निस्तेज झाला असेल तर दह्यात मध मिसळून चेहऱ्यावर लावा. संध्याकाळी दह्यामध्ये कोरफडीचा रस मिसळून चेहऱ्यावर लावा. त्यात चिमूटभर हळदही घालता येते.

त्वचेची खोलवर स्वच्छता करणे खूप महत्वाचे आहे. यासाठी टोमॅटोचे दोन भाग करा आणि काही काळ फ्रीजमध्ये ठेवा. ते काढल्यानंतर, कापलेल्या भागावर दही लावा आणि काही मिनिटे गोलाकार हालचालीत चेहऱ्यावर हलक्या हाताने घासा. अशा प्रकारे त्वचा खोलवर स्वच्छ होईल आणि मऊ देखील होईल.

■ ■

**अशोकायन**



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### सबका मालीक एक


ईश्वर म्हणा अल्ला म्हणा
की म्हणा तुम्ही वाहे गुरु
प्रत्येक प्रतिमेत त्याचाचअंश
हे नका हो आपण विसरू!

होईल याचा साक्षात्कार
ज्या दिवशी अंतर्मनात
धर्म पंथातील तंटे भौ
मिटतील क्षणार्धात ..!

तोच आहे सृष्टीचा राजा
आपण त्याची प्रजा
धर्मांध बनुनी नका हो
विश्वशांती भंग
करू राज्या ..!

# गुजरातमधील जुळ्या बहिणींचा जुळा निकाल!

गुजरातमधील सुरत येथील जुळ्या रीबा आणि राहिन हाफेजी यांनी एमबीबीएस अंतिम परीक्षेत समान गुण मिळवले. दोघींनाही ६६.८ टक्के गुण मिळाले. या मुलींनी कोचिंगशिवाय नीट-यूजी उत्तीर्ण केले. राहिनला शस्त्रक्रियेची आवड आहे तर रीबाला औषधांमध्ये रस आहे. या २४ वर्षांच्या बहिणींचे शिक्षण आणि आयुष्याचे निर्णय नेहमीच सारखेच राहिले आहेत. त्यांची आई गुलशाद बानू शिक्षक असून तिने दोघींनाही एकटीने वाढवले. या दोन बहिणींना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. पण त्यांनी ध्येय सोडले नाही. त्यांना कुटुंबातील पहिली डॉक्टर बनण्याचे होते. कोणत्याही खासगी क्लासशिवाय दोन्ही बहिणींनी नीट-यूजी वैद्यकीय प्रवेश परीक्षेत चांगली कामगिरी केली. रीबाला ९७ पर्सेंटाइल आणि राहीनला ९७.७ पर्सेंटाइल मिळाले.



**मेडिकल करण्याचा निर्णय**

राहिन म्हणते की, तिचे मामा डॉक्टर आहेत. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन तिने वैद्यकीय विषय शिकण्याचा निर्णय घेतला. लहानपणीही आम्हा दोघींना सारखेच गुण मिळायचे. त्या एकाच वसतिगृहाच्या खोलीत राहत होत्या आणि एकत्र लेक्चर अटेंड करत होत्या. रीबा म्हणते की, त्यांना जामनगर किंवा भावनगरच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळू शकला असता. पण दोघींनाही एकत्र राहायचे होते, म्हणून त्यांनी २०१९ मध्ये जीएमईआरएस कॉलेज निवडले. ते सुरतजवळ आहे. अर्थात शहराबाहेर एकटे राहण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती. या बहिणी म्हणतात की, त्यांना आई आणि आजी-आजोबांकडून खूप पाठिंबा मिळाला आहे.

**स्वप्नपूर्तीचा आनंद**

राहिनने सांगितले की, आम्ही अनेक चढउतार पाहिले आहेत. पण आई आणि आजी-आजोबा नेहमीच आमच्यासोबत राहिले आहेत. त्याचे स्वप्न पूर्ण करू शकलो याचा आम्हाला आनंद आहे. राहिनच्या मते, सरकारी शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक मदतीमुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास फारशी अडचण आली नाही. प्रसूतीशास्त्र आणि स्त्रीरोगशास्त्रासारख्या शस्त्रक्रियेत मोठे शिक्षण घ्यायचे आहे, असे राहिन म्हणते तर रीबाला औषधांमध्ये रस आहे. पण दोघींनाही एकाच कॉलेजमधून पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे आहे.

# टार्गेट पूर्ण न केल्याने कर्मचाऱ्याला बनवले कुत्रा!

## कॅलिडोस्कोप

केरळमध्ये टार्गेट पूर्ण न केल्याने व्यवस्थापकाने कर्मचाऱ्याला कुत्र्यासारखे फिरवले! गळ्यात पट्टा घालून त्याला दोन पाय आणि हातावर चालायला लावले.

तुम्ही कामाला असाल तिथे पगारासह सन्मान देणे हे कंपनीचे कर्तव्य आहे. मात्र कंपन्यांचा क्रूर चेहरा समोर आल्यावर अनेक प्रकारचे प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होतात. महिन्याच्या पगारासाठी रात्रंदिवस मेहनत करून कंपनीला नव्या उंचीवर नेणाऱ्या कर्मचाऱ्याला मान नाही का? असे प्रश्न केरळमधील या उदाहरणावरून निर्माण होतात. आता कंपनीकडून कर्मचाऱ्याने कंपनीचे ठरवलेले टार्गेट पूर्ण केले नसल्याचा दावा केला जात आहे.

**पोलिसांची चौकशी सुरू**

टार्गेट पूर्ण न केल्याच्या रागातून या संबंधित व्यवस्थापकाने कर्मचाऱ्याला कुत्रा बनवले आणि त्याच्या गळ्यात पट्टा बांधून कार्यालयात फिरवले जात असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात फिरतो आहे. काम वेळेत न



पूर्ण केल्यामुळे त्याला अशी अपमानास्पद शिक्षा देण्यात आली आहे. पोलिसांचे म्हणणे आहे की कंपनीच्या माजी व्यवस्थापकाचा कंपनीच्या मालकाशी वाद झाला आणि त्यानंतर त्याने नवीन प्रशिक्षणार्थींसोबत असे वर्तन केले. हा कंपनीच्या प्रशिक्षणाचा एक भाग असल्याचा दावा केला जात आहे. आता असे वागणाऱ्या व्यवस्थापकाने कंपनी सोडली आहे.

**कारवाई सुरू**

कुत्र्याचा पेहराव केलेल्या कर्मचाऱ्यासोबत आणखी एक माणूस चालताना आणि सिट-अप करताना दिसत आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर केरळच्या कामगार विभागाने कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या कथित छळाच्या चौकशीचे आदेश दिले असून या प्रकरणाचा अहवाल मागवला आहे. या प्रकरणी पोलिसांनी माजी व्यवस्थापकाला जबाबदार धरले आहे.

# असा होतो क्षमतेचा गैरवापर

क्रेडिट कार्ड, ऑनलाईन व्यवहारांबाबतच्या गैरप्रकारांमध्ये, फसवणुकीमध्ये बरीच वाढ होते आहे. हा प्रकार फक्त भारतातच घडतो असं नाही तर जगभरातच ही समस्या आ वासून उभी आहे. मध्यंतरी जपानमध्ये अशीच एक घटना घडली. इथल्या एका मॉलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने १३०० लोकांच्या क्रेडिट कार्डांचे नंबर लक्षात ठेऊन बरीच खरेदी केली. युसुके तानीगुची असं या कर्मचाऱ्याचं नाव आहे. त्याला क्रेडिट कार्डांची माहिती चोरून गैरप्रकार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. तानिगुचीचा मेंदू खूपच तल्लख असल्यामुळे तो क्रेडिट कार्डांचे नंबर लक्षात ठेवत असे. इतकंच नाही तर वापरकर्त्यांचं नाव, कार्डाची अंतिम तारीख, सीव्हीसी क्रमांक त्याच्या लक्षात रहायचे. त्याने या क्षमतेचा वापर गैरप्रकार करण्यासाठी केला. या माहितीच्या आधारे त्याने ऑनलाईन खरेदी केली. अशाच एका खरेदीदरम्यान त्याची चोरी पकडली गेली. तानीगुचीच्या घरात एक वही सापडली असून त्यात बऱ्याच कार्डांचे नंबर आणि इतर माहिती आढळली. तानीगुचीने आपल्या बौद्धिक क्षमतेचा गैरवापर केल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर दिल्या जात आहेत.




# राजधानी बदलाचा इतिहास



बऱ्याच देशांनी विविध कारणांमुळे आपल्या राजधान्या बदलल्या आहेत. कोणे एके काळी कलकत्ता ही भारताची राजधानी होती. मात्र १९३१ मध्ये दिल्लीला राजधानीचा दर्जा देण्यात आला. भौगोलिकदृष्ट्या दिल्ली देशाच्या मध्यभागी असल्याने आणि विविध ठिकाणांहून दिल्लीला सहजपणे जाता येत असल्याने हा निर्णय घेण्यात आला. इंडोनेशियाही आपली राजधानी बदलण्याच्या तयारीत आहे. या देशाची सध्याची राजधानी जकार्ता भविष्यात पाण्याखाली जाणार आहे. ही प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यामुळे या शहरात वाहतुकीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. हे लक्षात घेता हा देश बोर्नियो नामक बेटावर नवी राजधानी वसवण्याच्या तयारीत आहे. कझाकिस्तान या देशानेही आपली राजधानी बदलली. १९९१ मध्ये सोव्हियत युनियनपासून वेगळं झाल्यानंतर अलमातीला राजधानीचा दर्जा देण्यात आला. पण या शहराशी संबंधित बऱ्याच समस्या होत्या. त्यातच हे शहर भूकंपप्रवण भागात येत असल्यामुळे अस्तानाला नवी राजधानी वसवण्यात आली. आता हे शहर नूर सुल्तान या नावाने ओळखलं जातं. एकेकाळी रंगून ही म्यानमारची राजधानी होती. मात्र २००५ मध्ये इथल्या लष्कराने देशाची राजधानी नैप्यीदाला नेली. यामागचं नेमकं कारण स्पष्ट करण्यात आलेलं नाही. ब्राझीलनेही आपली राजधानी बदलली होती. जवळपास २०० वर्षं रिओ डी जेनेरो ही ब्राझीलची राजधानी होती. मात्र १९६० मध्ये ब्राझिलियाला राजधानीचा दर्जा देण्यात आला. रिओ डी जेनेरोला प्रचंड गर्दी असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

# पिवळ्या रंगावर काळी अक्षरं का?

देशभरात दररोज २२,५९३ रेल्वे धावतात. त्यात सुमारे १३,४५२ प्रवासी गाड्यांचा समावेश आहे. या माध्यमातून लाखो लोक प्रवास करतात. भारतातील सर्वात मोठे रेल्वे स्टेशन हावडा आहे. सर्वात व्यस्त रेल्वे स्थानकांच्या यादीतही त्याचा समावेश आहे.




भारतात एकूण रेल्वे स्थानकांची संख्या ७,३४९ आहे. भारतातील काही रेल्वे स्थानकांची नावे खूपच आश्चर्यकारक आहेत. परंतु आपल्या देशात अशा रेल्वे स्थानकांची कमतरता नाही, ज्यांची नावे वाचल्यानंतर किंवा ऐकल्यानंतर हसू आवरणार नाही. तूर्तास हा विषय मागे ठेवू या. पण रेल्वे स्थानकांची नावे पिवळ्या बोर्डांवर काळ्या रंगात का लिहिली जातात? हे जाणून घेऊ या. तर मंडळी, यामागे एक नाही तर अनेक कारणे आहेत.

**सतर्कतेचा संदेश**

रेल्वे स्टेशनचे नाव पिवळ्या बोर्डवर काळ्या अक्षरात लिहिण्याचे पहिले कारण म्हणजे पिवळा रंग खूप चमकदार रंग आहे. त्यामुळे रेल्वे चालकाला तो दुरुनच दिसतो. याशिवाय, पिवळा रंग थांबण्याचे संकेत देतो. पिवळे बोर्ड ट्रेनच्या लोको पायलटला वेग कमी करण्याचा किंवा सतर्क राहण्याचा इशारा देतो. अनेक रेल्वे स्थानकांवर गाड्या थांबत नाहीत, अशा गाड्यांचे लोको पायलट स्टेशनमध्ये प्रवेश केल्यापासून बाहेर पडेपर्यंत खूप सतर्क राहतात आणि सतत हॉर्न वाजवत राहतात. यामुळे स्टेशनवर उपस्थित प्रवासी सतर्क होतात.

**दुरून दिसण्यासाठी**

पिवळा रंग इतर रंगांपेक्षा खूपच प्रभावी असून रात्रीच्या अंधारातही तो दुरून दिसतो. याशिवाय, हे रंग डोळ्यांना खूप आराम देतात. पिवळ्या बोर्डवर काळ्या रंगात लिहिलेली स्टेशनची नावे दुरूनच दिसतात. या कारणांमुळे अशी रचना केलेली दिसते.

# मुलीच्या लग्नाआधीच आई जावयाबरोबर पसार

प्रेमाला वय किंवा मर्यादा नसते. प्रेम नात्यांकडे पाहत नाही ना प्रसंगाकडे त्याचे लक्ष असते. या संदर्भात अलीगढमधील एक धक्कादायक घटना सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मुलीच्या लग्नाची तारीख जवळ येत होती तसतसे सून आणि जावयातील प्रेम वाढत होते. याचा परिणाम असा झाला की, लेकीचे लग्न होण्यापूर्वीच सासू जावयासह घरातून पळून गेली.



संबंधित प्रकरणी सासू आणि जावई तास न तास फोनवर एकमेकांशी बोलत असत. मद्रक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मनोहरपूर गावात जितेंद्र नावाच्या व्यक्तीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, की जावई त्यांच्या पत्नीसह पळून गेला आहे. सासू जावयासह घरातून सुमारे ५० हजार रुपये घेऊन पळून गेल्याची माहिती आहे. सोन्या-चांदीच्या दागिन्यासह पाच लाख रुपयांचा ऐवज घेऊन ती जावयाबरोबर फरार झाली.

**स्मार्टफोनची किमया**

झाले असे की, सासूने आपल्या होणाऱ्या जावयाला स्मार्टफोन भेट म्हणून दिला होता. यातूनच दोघे सतत बोलत असत. या बाईच्या लेकीचे लग्न १६ एप्रिलला होणार होते; परंतु त्याआगोदरच जावई आणि सासू हे दोघे पसार झाले. जितेंद्र कुमार म्हणतात, की मुलीच्या लग्नाची सगळी तयारी पूर्ण झाली होती. मुलीला सन्मानाने घरी पाठवण्याचे त्यांचे स्वप्न होते. मात्र अचानक त्यांची पत्नी घरातून गायब झाली. सुरुवातीला ती कोणत्यातरी नातेवाइकाच्या घरी गेली असावी असे वाटले; मात्र ती न परतल्याने शोध सुरू करण्यात आला. तिकडे मुलीचा होणारा नवरही घरातून बेपत्ता असल्याचे समजले. यानंतर मोबाईल डिटेल्स काढले असता कुटुंबीयांना धक्का बसला.

# अत्तराच्या वासामुळे महिला विमानातच भिडल्या

विमानातील दोन प्रवाशांमध्ये अंगाचा आणि परफ्यूमचा वास यावरून झालेल्या वादाला हिंसक वळण लागले. त्यात फ्लाइट अटेंडंट जखमी झाला. शरीराच्या दुर्गंधीवरून प्रवाशांमध्ये झालेल्या भांडणात फ्लाइट अटेंडंटच्या हाताला प्रवाशाने चावा घेतला. शरीराच्या दुर्गंधीवरून दोन महिला प्रवाशांमध्ये भांडण झाले. एका महिला प्रवाशाने दुसरीच्या शरीराच्या दुर्गंधीवर अस्वस्थता व्यक्त केल्यावरून हाणामारी सुरू झाली, तर दुसरीने पहिलीच्या अत्तराच्या तीव्र वासावर आक्षेप घेतला. या वादाने रुपांतर मारामारीत झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आलेल्या फ्लाइट अटेंडंटवर हल्ला करण्यात आला. त्याच्या हाताला चावा घेतला गेला आणि आणखी एका प्रवाशालाही ओरखडे आले.



**भांडणामुळे विमान दोन तास लेट**

विमान कंपनीने या घटनेची पुष्टी केली असून जखमी फ्लाइट अटेंडंटला किरकोळ दुखापत झाल्यामुळे ताबडतोब रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगितले आहे. आता तिची प्रकृती स्थिर आहे. या प्रवासी महिलांमध्ये वाद सुरु झाल्यावर दोन महिला फ्लाइट अटेंडंट आणि दोन पुरुष सहकाऱ्यांनी भांडण थांबवण्याचा प्रयत्न केला. पण यामध्ये एकजण जखमी झाली. घटनेनंतर दोन्ही प्रवाशांना पोलिसांनी ताब्यात घेतले. प्रवासाचा पहिला टप्पा संपल्यानंतर फ्लाइटमधील इतर प्रवाशांना उतरवण्यात आले आणि नंतर फ्लाइट दोन तासांच्या विलंबाने निघाली. विमानाला उशीर झाल्याने उर्वरित प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागले.

# करांची करकिर



आपण आयकर भरतो. पाणीपट्टी, घरपट्टी तसंच इतर विविध माध्यमातून कर वसूल केला जातो. पण तुम्ही कधी उन्हासाठी किंवा सावलीसाठी कर भरला आहे का? नाही ना, पण काही देशांमध्ये यासाठीही कर घेतला जातो. जगभरातल्या अशाच काही विचित्र करपद्धतींविषयी...

* अमेरिकेतल्या ऑर्कन्स राज्यात शरीरावर टॅटू गोंदवल्यास सहा टक्के कर भरावा लागतो.
* स्पेनमधल्या बॅलरिक बेटांवर २०१६ पासून सन टॅक्स वसूल केला जातो. युरोपातल्या देशांमध्ये सूर्यप्रकाश खूप कमी काळ असतो. म्हणूनच मुबलक सूर्यप्रकाश असणाऱ्या या ठिकाणी पर्यटकांची बरीच गर्दी होते. त्यांच्याकडून हा कर घेतला जातो.




* अमेरिकेत २०१० पासून टॅनिंग टॅक्स वसूल केला जातो. पाश्चिमात्य देशांमध्ये त्वचेच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत चाललं आहे. या कर्करोगाला आळा घालण्यासाठी टॅनिंग कर वसूल केला जात आहे.
* हंगेरीत २०११ पासून डबाबंद खाद्यपदार्थांमध्ये साखर आणि मीठाचं प्रमाण जास्त असणाऱ्या कंपन्यांकडून कर वसूल केला जातो.

अमेरिकेतल्या अलबामा राज्यात पत्त्यांचा कॅट खरेदी करणाऱ्यांकडून कर वसूल केला जातो.

# मुलांच्या हाती रेल्वेची जबाबदारी



एखाद्या रेल्वेस्थानकाची सगळी जबाबदारी महिला सांभाळत असल्याचं तुम्ही ऐकलं असेल. पण रेल्वेस्थानकावरची सगळी कामं लहान मुलं करत असल्याचं फारसं ऐकिवात नसेल. मात्र हंगेरीची राजधानी बुडापेस्टमधल्या डोंगराळ भागातल्या जंगलात असणाऱ्या एका रेल्वे स्थानकावर सगळी कामं करण्यासाठी लहान मुलांची नियुक्ती करण्यात आली आहे. गार्ड, स्टेशन मास्तर, तिकिट तपासनीस, तिकिट खिडकीवरचे कर्मचारी म्हणून ही मुलंच काम बघतात. इथे काही मुलं गणवेशात असतात तर काही गणवेशाशिवायही काम करतात. या रेल्वे स्थानकावरून विशेष ट्रेन धावते. ही ट्रेन ४० मिनिटांमध्ये ११ किलोमीटर अंतर कापते. ४० ते ५० प्रवासी या ट्रेनमध्ये बसू शकतात. इथे फारशी वर्दळ नसते. काही लोक फक्त मुलांचं काम बघण्यासाठी इथे येतात. एकेकाळी हंगेरी हा सोव्हियत युनियनचा भाग होता. त्यावेळी मुलांना जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी ङ्गपायोनिअर रेल्वेफ सुरू करण्यात आली होती. त्या काळी प्रौढांसोबत मुलंही इथे काम करायची. हंगेरी स्वतंत्र झाल्यानंतरही या स्थानकावर ही प्रथा सुरू ठेवण्यात आली आहे.

# काही लोक घरातून बाहेर पडतच नाहीत

## ते घराच्या बाहेर पडले की पार देशाच्या बाहेरच जातात : एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. २७ :

हिंदुहृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुत्ववादी शिवसेना आणि धनुष्यबाण हे उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसच्या दावणीला बांधले. यामुळे आम्ही उठाव केला आणि सर्वार्थाने यशस्वी झालो. तेंव्हा ते म्हणाले की न्यायालय, निवडणूक आयोगाने आमच्या बाजूने निकाल दिला, आता आम्ही जनतेच्या न्यायालयात न्याय मागू. एकही गद्दार निवडणुकीत जिंकणार नाही असा दावा केला. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीतही जनतेनेही आम्हाला कौल दिला, भरघोस मतांनी आम्हाला विजयी केले. स्पष्ट बहुमत दिले.उलट ठाकरेंचे पानिपत झाले. त्यामुळे खरी शिवसेना आमचीच हे सिद्ध झाले, असे टिकास्त्र शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केले. लाडकी बहीण योजना काहीही झालं तरी बंद पडू देणार



नाही, अशी ग्वाहीसुद्धा त्यांनी दिली.

निवडणुकातील विजयाबद्धल मतदारांचे ऋण व्यक्त करण्यासाठी एकनाथ शिंदे हे आज (रविवारी) बुलढाणा जिल्ह्यात आले होते. यावेळी बुलढाणा शहरातील राजमाता जिजामाता व्यापार व क्रीडा संकुल परिसरात आयोजित आभार सभेत शिंदे बोलत होते. भाषणाच्या सुरुवातीचा भाग आणि समारोप सोडला तर मुख्यमंत्री असतानाची कामे, उद्धव ठाकरे यांच्यावरील टिकास्त्र यावरच त्यांच्या भाषणाचा रोख होता.

रणरणत्या उन्हात पार पडलेल्या या सभेला केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव, पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, मृद संधारण मंत्री संजय राठोड, सभेचे आयोजक तथा बुलढाणा आमदार संजय गायकवाड, प्रवक्त्या ज्योती वाघमारे, माजी आमदार संजय रायमूलकर, शशिकांत खेडेकर, जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, बळीराम मापारी, शांताराम दाणे, युवासेनेचे मृत्युंजय गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. मी शेतात गेलो तर टीका, गावात गेलो की टीका, काश्मीरमध्ये गेलो की तरी टीका आहेच. आता मी नेहमी घराबाहेर राहून काम करणारा हाडाचा कार्यकर्ता आहे. ते घराबाहेर पडतच नाही, बाहेर पडले की सरळ परदेशात जातात. तसेही सध्या आमच्यामुळे, आणि त्यांच्या पक्षात वेगाने सुरु असलेल्या गळतीमुळे राजकीय वातावरण तापलेले आहे. यामुळे ते थंड हवा घ्यायला गेले असावे, असा टोला त्यांनी उद्धव ठाकरेंचा नामोल्लेख न करता लगावला.

ठाकरे गटाने जणाधार गमविल्याचे सांगून आम्ही विधानसभेत ८० जागा लढविल्या, ६० जिंकल्या, काही जागा कमी फरकाने गमावल्या. ठाकरेंनी १०० जागा लढविल्या अन २० जागा जिंकल्या. अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात केलेला विकास व लाडकी बहीण सारख्या योजनामुळे महायुतीला बहुमत मिळाल्याचा दावा शिंदेनी यावेळी केला.

पहेलगाम येथील अतिरेकी हल्ला हा देशावरील हल्ला असल्याचे सांगून आता पाकड्यांचे कंबरडे मोडले पाहिजे ही करोडो भारतीयांप्रमाणे आमचीही इच्छा आहे. मी काशिमराला जाण्यापूर्वी खासदार श्रीकांत शिंदे तिथे पोहोचले. मी गेल्यावर त्यांनी टीका केली. आम्ही तिथे मदतीसाठी गेलो, विमानाने लोकांना राज्यात आणले, इतरांसारखे लांबून सांत्वन करणारे आम्ही नाही, असा टोला त्यांनी लगावला.

यावेळी केंद्रीय मंत्री जाधव, गुलाबराव पाटील यांची समायोचित भाषणे झाली. आमचे नेते मतदारांचे आभार मानायला आले. पण खरं तर त्यांनी मुख्यमंत्री असताना दिलेल्या कोट्यवधींचा निधी अन त्यातून झालेली विकासकामे याबद्धल आम्हीच त्यांचे आभार मानायला हवे, असा समान सूर त्यांनी आळवला. आमदार संजय गायकवाड यांनी मतदारसंघातील विकासाचा आढावा घेत याबद्धल शिंदेचे आभार मानले. संचालन अनिल रिंढे यांनी केले.

## विदर्भाला गारपिटीचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७ :

राज्यात आणि विशेषकरुन विदर्भात तापमानाचा पारा चांगलाच चढला होता. विदर्भातील तापमान ४६ अंश सेल्सिअसपर्यंत जाऊन पोहोचले होते. तब्बल तीन शहरे ४५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तर अधिकांश शहरांमध्ये पारा अंश सेल्सिअसवर गेला होता. मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात देखील तापमानाने बरेच रेकॉर्ड मोडले होते. याठिकाणीदेखील अनेक शहरांमध्ये पारा ४४ अंशापर्यंत जाऊन पोहोचला होता. संपूर्ण राज्यच उष्णतेत होरपळत असताना हवामान खात्याने आता दिलासा देणारा अंदाज व्यक्त केला आहे. भारतीय हवामान खात्याने येत्या तीन ते चार दिवसांसाठी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, राज्यात येत्या तीन ते चार दिवसात संमीश्र स्वरुपाचे हवामान राहण्याची शक्यता आहे. याशिवाय वादळी वाऱ्यासह आणि ढगांच्या गडगडासह पावसाचा अंदाज देखील वर्तवण्यात आला असून काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र येथेही उष्णदमट हवामानासह पावसाची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील चंद्रपूर तसेच गडचिरोली जिल्ह्याला रविवारी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

विदर्भ तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना येलो अलर्ट तर २८ एप्रिल म्हणजेच सोमवारी भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये तसेच मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पर्वतीय भागांमधील हवामानामध्ये झालेल्या बदलांसह दक्षिण भारताकडून वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे महाराष्ट्रातील हवामानावर परिणाम होत आहे. गेले काही दिवस राज्यात तापमानात चांगलीच वाढ झाली होती.

## देशातील पहिले रोड सेफ्टी व्हिजन वाहन अकोल्यात

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. २७ :




अत्याधुनिक वाहनाद्वारे अपघातावर नियंत्रण मिळवता येऊ शकते. रोड सेफ्टी व्हिजन हे अत्याधुनिक वाहन अकोला प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून तयार करून घेण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत बचाव कार्यसह लोकशिक्षणासाठी हे वाहन फायदेशीर ठरेल. या वाहनात विविध सुविधा असून आरटीओच्या सेवा देखील उपलब्ध होतील. या प्रकारचे देशातील हे पहिलेच वाहन असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार यांनी दिली.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून रोड सेफ्टी व्हिजन हे अत्याधुनिक सुविधा असलेले वाहन जिल्ह्याच्या सेवेत रूजू झाले. त्याला हिरवी झेंडी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी दाखवली. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, उपवनसंरक्षक कुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम अभियंता प्रसाद पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन दराडे, अनिरूद्ध देवधर, संदीप तायडे, संदीप तुरकणे, किरण लोणे, मनोज शेळके आदी उपस्थित होते. जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या प्रस्तावानुसार जिल्हा नियोजन समितीने या वाहनासाठी ३३ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला. त्यातून हे वाहन निर्माण झाले. जिल्ह्यात अपघातप्रवण स्थळांची संख्या शून्यावर आणणे आवश्यक आहे. सुरक्षित वाहतुकीसाठी विविध उपाययोजना अंमलात आणतानाच प्रभावी लोकशिक्षण दिले पाहिजे. रोड सेफ्टी व्हिजन वाहनाच्या माध्यमातून हे कार्य करता येणार आहे. अपघात घडूच नयेत यासाठी शिस्त निर्माण करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

या वाहनाने साडेसात टनपर्यंत वजन असलेले वाहन ओढून नेता येते. एखादी व्यक्ती वाहनात अडकली असेल तर त्याला बाहेर काढण्यासाठी लागणारे कटर सुद्धा या वाहनात आहे.

## रानटी हत्तींच्या हल्ल्यात तीन महिला जखमी

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २७ :

ओडिशाहून स्थलांतरित झालेल्या रानटी हत्तींनी गेल्या तीन वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्याला आपला अधिवास बनविला आहे. या हत्तींनी गडचिरोली वनपरिक्षेत्रातील वाकडी तीन ते चार गावांमध्ये धुमाकूळ घालत तीन महिलांना गंभीर जखमी केले आहे. यातील एकीला उपचारासाठी नागपूर येथे हलवण्यात आल्याची माहिती आहे. सुशीला टेमसू मेश्राम (४२), योगिता उमाजी मेश्राम (४०), पुष्पा निराजी वरखेडे (४०) अशी जखमी महिलांची नावे आहेत.

मागील आठवडाभरापासून गडचिरोली वन विभागातील वाकडी, हिरापूर, मसली, कृपाळा गावात रानटी राणी हत्तींनी आपले बस्तान मांडले आहे. २६ एप्रिल रोजी सकाळी कृपाळा येथील १०-१२ महिला गावानजीकच्या नदीवर कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. तेवढ्यात जवळपास १८ ते २० हत्तींचा कळप त्याठिकाणी पोहोचला. यातील काही हत्तींनी महिलांवर हल्ला केला. सुशीला मेश्राम या महिलेला हत्तीची धडक लागल्याने तिला मुका मार लागला. तिला नागपूरला हलविण्यात आले आहे.

## समृद्धी महामार्गावर कारची ट्रकला धडक

■ महासागर प्रतिनिधी,
मंगरूळपीर, दि. २७ :

वाशीम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यात समृद्धी महामार्गावर दिनांक २६ एप्रिल रोजी सकाळी भीषण अपघात झाला.

नागपूरहून शनिशिंगणापूर येथे जाणाऱ्या एका भरधाव फॉर्च्युनर कारने समोर चालणाऱ्या ट्रकच्या मागच्या बाजूला जोरदार धडक दिली. या अपघातात कारमधील एका २८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कारमधील तरुण हे शनिशिंगणापूर येथे दर्शनासाठी समृद्धी महामार्गाने निघाले होते. परंतू वाटेतच त्यांच्यावर काळाने घाला घातला. मंगरूळपीर तालुक्यातील लोकेशन २०७ वर आल्यानंतर कारची समोरील ट्रकला जोराची धडक दिली. या अपघातात श्रीजित राऊत या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तो नागपूरचा रहिवासी आहे. तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले.



जखमी झालेल्या दोघांना तातडीने कारंजा येथील उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. धडक इतकी जोरदार होती की, फॉर्च्युनर कारचा समोरील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. अपघातानंतर घटनास्थळी प्रचंड गोंधळ उडाला होता. अपघाताची माहिती मिळताच समृद्धी महामार्गाचे मदत पथक घटनास्थळी दाखल होऊन जखमींना मदत केली.

## एमबीबीएस प्रवेशाच्या नावावर लाखोंचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७ :

एमबीबीएसला प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या आर.के. एज्युकेशन काऊंसलिंग सेंटरच्या संचालकासह ३ जणांविरुद्ध लकडगंज पोलिसांनी फसवणुकीचा आणखी एक गुन्हा नोंदविला आहे. यापूर्वी जानेवारी महिन्यातही पोलिसांनी आरोपींवर ७५ लाखांच्या फसवणुकीचा प्रकरण नोंदविले होते. नवीन तक्रार रमेश फुलचंद शर्मा (५०) रा. वाडी यांच्या तक्रारीवरून नोंदविण्यात आली. आरोपींमध्ये टेलिफोन एक्सचेंज चौकातील आर.के. एज्युकेशन सेंटरचे संचालक परिमल चंद्रशेखर कोटपल्लीवार रा. रमना मारोतीनगर आणि त्याचे भागीदार मिलिंद रमेश धवड आणि विशाल गजानन खापेकर दोन्ही रा. जुनी शुक्रवारी यांचा समावेश आहे.

फिर्यादी रमेश यांचा मुलगा १२ वी उत्तीर्ण झाला होता. त्याला एमबीबीएसला प्रवेश घ्यायचा होता. एका वृत्तपत्रात जाहिरात पाहून रमेशने आर.के. एज्युकेशनच्या कार्यालयात संपर्क केला. परिमलने त्यांना, कमी गुण असल्याने तुमच्या मुलाला एमबीबीएसला प्रवेश मिळू शकत नाही, मात्र तो त्याला आयुर्वेदिक महाविद्यालयात प्रवेश मिळवून देऊ शकतो, अशी माहिती दिली. १ नोव्हेंबर २०२४ ते ३० डिसेंबर २०२४ पर्यंत आरोपींनी वेळोवेळी वेगवेगळे कारण सांगत रमेश यांच्याकडून १०.५३ लाख रुपये घेतले. मात्र अनेक महिने लोटूनही त्यांच्या मुलाला प्रवेश मिळाला नाही. शेवटी त्रस्त होऊन रमेश यांनी प्रकरणाची तक्रार लकडगंज पोलिसात केली.

## कुऱ्हाड, कोयत्याने वार करत तरुणाचा खून

■ महासागर प्रतिनिधी,
सिन्नर, दि. २७ :

तालुक्यातील शहा येथे कुऱ्हाड व कोयत्याने वार करत तरुणाचा खून केल्याची घटना शनिवारी (दि. २६) सकाळी घडली. प्रवीण गोरक्षनाथ कांदळकर (२२) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी वावी पोलिस ठाण्यात आई विजया कांदळकर यांच्या फिर्यादीवरून १४ संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रवीण गेल्या दोन वर्षांपासून तडीपार होता. शुक्रवारी रात्री तो घरी आला होता. शनिवारी सकाळी प्रवीणच्या घराच्या दरवाजावर काहीतरी फेकल्याचा आवाज आला. प्रवीणच्या आई-वडिलांनी बाहेर पाहिले असता गावातील सौरभ गोराणे, दिनेश गोराणे, वाळीबा गोराणे, शरद गोराणे, विजय गोराणे, सचिन बागल, राहुल बागल, अतुल गोराणे, आबा गोराणे, रवींद्र गोराणे, वैभव गोराणे, दगू साप्ते, गणेश सोनवणे, सजेराव गोराणे हातात कोयता, कुऱ्हाडी, लोखंडी रॉड, दांडके घेत उभे होते. प्रवीणच्या आई-वडिलांनी विचारले असता, तुमचा मुलगा हा जास्त शहाणा झाला का, आम्हाला धमकी देतो असा दम दिला. त्यांना अडवण्याचा प्रयत्न असता केला असता रस्त्यावर ढकलून देत घरात शिरले.

आई-वडिलांनी शेजाऱ्यांकडे मदत मागितली असता कुणीही आले नाही. संशयितांनी प्रवीणच्या मारहाण करत गंभीर जखमी केले. त्यानंतर संशयितांनी प्रवीणच्या आई-वडिलांनाही मारहाण केली. संशयितांनी जखमी प्रवीणला घरातून बाहेर ओढत आणत पसार झाले. आई-वडिलांनी प्रवीणला तातडीने सिन्नर ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी वावी पोलिस तपास करत आहे.

## पैठण येथे आग कामगाराचा गुदमरून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
पैठण, दि. २७ :

पैठण एमआयडीसीतील इनकोर हेल्थ केअर कंपनीत वेल्डिंगदरम्यान आग लागून एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी घडली. रामदास जगन्नाथ बडसल (५४) असे मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते कंपनीत कायमस्वरूपी कर्मचारी होते. दुसऱ्या मजल्यावर वेल्डिंगचे काम सुरू असताना अचानक ठिणगी उडाली. त्यामुळे आग लागली. वरच्या मजल्यावर धुराचे लोळ पसरले. रामदास बडसल आग पाहून वर गेले. मात्र धुरामुळे गुदमरून त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच आमदार विलास भुमरे यांनी कंपनीत पाहणी केली. अडकलेल्या सर्व कामगारांना तत्काळ बाहेर काढण्याच्या सूचना दिल्या. पोलिस आणि अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी शोधमोहीम सुरू केली. रामदास बडसल दोन तासांनी बेशुद्ध अवस्थेत सापडले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या आगीत इतर दोन कर्मचारी किरकोळ जखमी झाले. आग लागल्याचे कळताच कंपनीमध्ये काम करत असलेल्या १०२ महिलांसह दीडशे कर्मचाऱ्यांना पंधरा मिनिटात कंपनीच्या गेटच्या बाहेर पोलिसांसह व्यवस्थापन व सुरक्षा कर्मचाऱ्यांनी बाहेर काढले. परंतु वरच्या मजल्यावर काम करीत असलेला रामनाथ बडसल या आगीच्या धुराळात मयत झाला. पैठण एमआयडीसीमध्ये एकच अग्निशमन गाडी असून पैठण नगर परिषद व संभाजीनगर येथील अग्निशमन दलाला पाचारण करून चार तासात ही आग विझविण्यात आली. संभाजीनगरच्या अग्निशमन विभागाला आमदार भुमरे यांनी तत्काळ फोन करत अधिकच्या गाड्या पाचारण केल्या. इनकोर हेल्थ केअर ही ९० च्या दशकातील पैठण एमआयडीसीतील सर्वात मोठी मेडिटेशन कंपनी आहे. पैठण एमआयडीसी हद्दीत इनकोर फार्मा ही कंपनी आहे. त्या कंपनीमध्ये अंदाजे ३०० कामगार काम करतात. ३ शिफ्टमध्ये काम चालते. प्रत्येक शिफ्टला अंदाजे १०० ते १२५ कामगार कामावर असतात. आज रोजी सदर कंपनीत आग लागली आहे.

## काश्मीरमध्ये २६ पर्यटकांच्या क्रूर हत्येचा तीव्र निषेध

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७ :

उरी, पठाणकोट, पुलवामा यांसारख्या आतंकवादी हल्ल्यांना ठोस प्रत्युत्तर दिल्यानंतरही भारतातील आतंकवाद संपलेला नाही, हे काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण आतंकवादी हल्ल्यातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. या ठिकाणी आतंकवाद्यांनी पर्यटकांचे हिंदू अशी ओळख पटवून २६ निष्पाप पर्यटकांची अमानुष हत्या केली.

यामध्ये एका नवविवाहित महिलेच्या डोळ्यांसमोर तिच्या पतीची हत्या करण्यात आली. हा प्रकार केवळ आतंकवाद्यांच्या क्रौर्याचे प्रदर्शन नाही, तर भारताच्या सार्वभौमत्वावर आणि हिंदु समाजावर झालेला थेट आघात आहे. फक्त निषेध पुरेसा नाही, तर भारत सरकारने इस्रायलचे उदाहरण घेऊन आतंकवाद्यांवर आणि त्यांच्या पालक पाकिस्तानवर कठोर




लष्करी कारवाई केली पाहिजे, अशी जोरदार मागणी हिंदु राष्ट्र समन्वय समिती, नागपूर यांच्या वतीने व्हेरायटी चौक, नागपूर येथे आयोजित 'हिंदु राष्ट्र जागृती आंदोलन'मध्ये करण्यात आली. या आंदोलनात हिंदु जनजागृती समिती, लोक जागृती मोर्चा, सनातन संस्था आणि अन्य संघटनांनी सहभाग घेतला. लोक जागृती मोर्चाचे अध्यक्ष अधिवक्ता रमण सेनाड, हिंदु जनजागृती समितीचे अभिजित पोलके अधिवक्ता वैशाली परांजपे यांनी आंदोलनाला संबोधित केले.

या आंदोलनात सुश्री जय माँ शक्ती, राहुल पांडे, दिलीप कुकडे, महादेव दमाहे, विक्रांत पालांदुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. या हल्ल्यात विविध राज्यांतील पर्यटकांनी हौतात्म्य पत्करल्याने आतंकवाद्यांचा उद्देश संपूर्ण देशात भीती पसरवण्याचा असल्याचे स्पष्ट होते. या नरसंहाराचे जे व्हिडीओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित झाली आहेत, ती मानवतेलाही लज्जास्पद वाटावी अशी आहेत.

गेल्या काही काळात हिंदु व्यावसायिकांवर, कर्मचाऱ्यांवर आणि काश्मिरी हिंदूंवर सातत्याने हल्ले होतात आहेत. त्यामुळे या हत्याकांडामध्ये स्थानिक संघटना, नेते, राजकीय पक्ष व प्रशासनातील व्यक्तींचा सहभाग आहे का, याची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

## २१०० रुपये देऊ असे कुणीच म्हटले नाही : नरहरी झिरवाळ

■ महासागर प्रतिनिधी,
जळगाव, दि. २७ :

लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? याकडे लक्ष लागले असताना आता राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री यांनी २१०० रुपये देण्याबाबत मोठे विधान केले आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असे कुणीच म्हटले नाही, असे नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. तसेच लाडक्या बहिणी या १५०० रुपयांत खुश असल्याचेही ते म्हणालेत.

राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देऊ, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारावेळी दिले होते. महायुती सत्तेत आल्यानंतर लाडक्या बहिणींना २१०० रुपये



कधीपासून मिळणार, असा प्रश्न विचारला जात होता. तेव्हा अर्थसंकल्पात याबाबत निर्णय घेतात, असे महायुतीच्या नेत्यांकडून सांगण्यात आले होते. १० मार्च रोजी अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला. मात्र या योजनेचा सन्मान निधी वाढवण्याबाबत कोणतीही घोषणा झाली नाही. लाडक्या बहिणींना २१०० ऐवजी १५०० रुपयेच मिळत आहेत, असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी पत्रकार परिषदेत मंत्री नरहरी झिरवाळ यांना विचारला. यावर बोलताना लाडक्या बहिणी नाराज आहेत, हे आपण सांगत असता किंवा विरोधक सांगत असतात. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे कोणीही जाहीर केलेले नाही.

## इतवारी स्थानकावर रेल्वे कोच रेस्टॉरंटचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७ :

नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी रेल्वे स्थानकाच्या विकास मालिकेचा एक भाग म्हणून, प्रधान मुख्य व्यावसायिक व्यवस्थापक प्रवीण पांडे यांच्या हस्ते स्टेशन परिसरात रेल कोच रेस्टॉरंटचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता, विभागीय वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह आणि इतर विभागीय अधिकारी प्रमुख उपस्थित होते.

हे रेस्टॉरंट हल्दीराम चालवेल. रेल्वेने येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी हे योग्य असेल. यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता म्हणाले की, विभागातील छिंदवाडा आणि गोंदिया स्थानकांवरही अशीच रेस्टॉरंट्स उघडण्यात आली आहेत. ज्यामुळे प्रवाशांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. विभागातील इतर स्थानकांवरही अशाच सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सर्वांनी हल्दीरामच्या विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. ब्रॉडगेज गाड्यांच्या डब्यांमध्ये सुंदर आतील सजावटीसह पूर्णपणे वातानुकूलित प्रणाली तयार करण्यात आली आहे. हे आउटलेट २४ तास सुरू राहील, अशी माहिती रेस्टॉरंट चालकांनी दिली आहे.

## अतिदुर्गम कटेझरीत स्वातंत्र्याच्या ७८ वषार्नंतर पहिल्यांदाच पोहोचली एसटी बस

■ महासागर प्रतिनिधी,
गडचिरोली, दि. २७ :

जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलग्रस्त गाव म्हणून ओळख असलेल्या कटेझरी येथे स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर प्रथमच परिवहन महामंडळाची बस पोहोचली. पोलीस दलाच्या पुढाकाराने सुरु झालेल्या बसचे गावकऱ्यांनी जल्लोषात स्वागत केले. गडचिरोली जिल्ह्यातील अनेक गावात अजूनही दळणवळणाची प्रभावी साधने नाहीत. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतात. धानोरा तालुक्यातील कटेझरी हे गावदेखील असेच आहे. तेथे शनिवारी २६ एप्रिलला बसचा



शुभारंभ करण्यात आला.

उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे यांनी बसचे स्वागत करुन नागरिकांना मार्गदर्शन केले. स्थानिक नागरिकांनीही ढोल-ताशांच्या निनादात आनंद व्यक्त केला. कटेझरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अजय भोसले यांनी हिरवी झेंडी दाखवून बसला मार्गस्थ केले. यावेळी बसचालक व वाहक यांचा सत्कार करण्यात आला. नागरिकांनी बसमधून प्रवास केला. आजूबाजूच्या १० ते १२ गावांतील नागरिकांना या बससेवेचा लाभ होणार आहे.

पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या संकल्पनेतून अपर पोलीस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) एम. रमेश, उपविभागीय पोलीस अधिकारी, जगदीश पांडे, पोलीस उप-अधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली दुर्गम भागातील नागरिकांचे जगणे सुसह्य व्हावे यासाठी गडचिरोली पोलिस दलाकडून विविध उपक्रम राबविले जात असतात.

यंदा १ जानेवारी २०२५ रोजी गट्टा ते गर्देवाडा व त्यापुढे वांगेतुरी बस सेवा देखील सुरु करण्यात आली. दुर्गम भागात मागील पाच वर्षांमध्ये ४३४.५३ किलोमीटर लांबीच्या एकूण १८ रस्त्यांसोबतच एकूण ५९ पुलांचे बांधकाम पोलिस संरक्षणात पूर्ण करुन घेण्यात आले आहे. आता अतिदुर्गम कटेझरी येथील नागरिकांना साधन उपलब्ध झाल्याने त्यांचा प्रवासाचा संघर्ष थांबणार आहे.